अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १९ ऑक्टोबर २०२२ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २२ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## शाहीर साबळेंचे 'जय जय महाराष्ट्र' माझा हे 'राज्यगीत' होणार

**मुंबई** : शाहीर साबळे यांचं जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत ऐकल्यावर वीरश्री सळसळते. जय जय महाराष्ट्र माझा हे राज्यगीत होणार असल्याची माहिती सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. हे गाणं राज्य गीत झाल्यानंतर अधिकृत गाणं असलेल्या देशातील निवडक राज्यांच्या यादीत लवकरच महाराष्ट्र राज्याचाही समावेश होऊ शकतो असंही सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

जय जय महाराष्ट्र माझा' या गीताला राज्य सरकार राज्याचे अधिकृत राज्य गीत म्हणून अंतिम रूप देण्याच्या तयारीत आहे. जय जय महाराष्ट्र माझा हे राज्यगीत होणार असून. या गाण्यातून महाराष्ट्र राज्य, इतिहास आणि संस्कृती आणि उत्सवांचे कौतुक होईल. या विषयावर चर्चा करण्यासाठी मागील महिन्यात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सद्यस्थितीत देशातील केवळ ११ राज्यांचेच स्वत:चे असे गाणे आहे. यात आता महराष्ट्र राज्याचेही स्वत:चे गीत असेल. महाराष्ट्राचे अधिकृत राज्य गीत म्हणून जय जय महाराष्ट्र माझा' या गाण्याला नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मान्यता मिळेल असंही सुधीर मुनगंटीवार म्हणाले.



१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले त्यावेळी मुंबईतील दादर येथे शिवाजी पार्कमध्ये झालेल्या कार्यक्रमात शाहीर साबळे यांनी राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासमोर हे गाणे गायले होते. जय जय महाराष्ट्र माझा हे गीत १.१५ ते १.३० मिनिटांमध्ये बसेल असे या गाण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

# सीसीएचवर दाखल होताच गुन्हा, गंडवण्यासाठी नवा ॲप आला पुन्हा

## ■ बुडालेला पैसा काढण्यासाठी नवा जुगाड, नवा जुगार

सुराज्य/सोलापूर

**झटपट श्रीमंत होण्यासाठी हजारो रुपये गुंतवल्यानंतर लाखो रुपये देण्याचे आमिष दाखवून शेकडो सोलापूरकरांना करोडो रुपयांचा गंडा घालणाऱ्या सीसीएच ॲपवर गुन्हा दाखल झाला. त्याचा अद्याप तपास सुरू झालेला नसतानाच सोलापूरकरांना लुबाडण्यासाठी नवा ॲप पुन्हा बाजारात अवतरला आहे. विशेष म्हणजे सीसीएच ॲपमधून ज्यांनी लाखो रुपये कमवले त्यांनी आणखी कमवण्यासाठी आणि ज्यांनी लाखो रुपये गमावले; त्यांनी ते मिळवण्यासाठी या नव्या ॲपमध्ये गुंतवणूक सुरू केली आहे. बुडालेला पैसा काढण्यासाठी सुरू केलेला हा नवा जुगाड किती दिवस टिकणार आणि हा नवा जुगार किती दिवस चालणार? हे मात्र निश्चित नसल्यामुळे सोलापूरकर पुन्हा नव्या फसवणुकीत अडकतात की काय? असा संशय निर्माण झाला आहे.**




गेल्या काही महिन्यांपासून हजारो गुंतवल्यानंतर लाखो रुपये मिळवून देणाऱ्या सीसीएच ॲपचा धूमधडाका सोलापूर शहरात सुरू होता. गेल्या आठवड्यातच या ॲपने करोडोंचा चुना लावून रातोरात गाशा गुंडाळून पोबारा केल्यानंतर घाबरागुबरा झालेला सोलापूरकर नागरिक फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवताना दिसला. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून तपास गुन्हे शाखेकडे वर्ग झाला आहे. गुन्हे शाखेने अद्याप या तपासाला हात घातलेला नाही. सोलापुरात सगळीकडे हीच चर्चा सुरू असताना लाखो रुपये कमवून देणाऱ्या नव्या ॲपची चर्चा शहरात सुरू झाली आहे. त्याचवेळी हा ॲप किती दिवस टिकणार आणि किती दिवस गुंतवलेल्या रकमेचा परतावा मिळणार? हे निश्चित नसल्यामुळे दुसऱ्या बाजूला गंडवले जाण्याची भीतीसुध्दा निर्माण झाली आहे.

**घोटाळा होण्यापूर्वीच ठोकावा टाळा** : येणाऱ्या काळामध्ये सीसीएचप्रमाणे मोठा घोटाळा होऊ शकतो. त्या आधीच लोकांनी सतर्क झाले पाहिजे. अशा प्रकारच्या गुंतवणुकीमध्ये आपल्या कष्टाचा पैसा घातला नाही पाहिजे. सायबर विभागाने व पोलीस प्रशासनाने याचा तपास करून गुन्हेगारांचा शोध घेतला पाहिजे. गुन्हा घडल्यानंतर तपास करण्यापेक्षा अशा प्रकारचा गुन्हा घडूच नये यासाठी पोलीस यंत्रणेने पावले उचलली पाहिजेत.

**- राज सलगर (सामाजिक कार्यकर्ते)**

### ■ तीच फाईल, तशीच स्टाईल

सीसीएच ॲप गुगल प्लेस्टोरवरून इन्स्टॉल केल्यानंतर रुपयांमधील गुंतवणुकीला डॉलरमध्ये परतावा मिळत होता. अगदी सीसीएच ॲपची जी स्टाईल होती; त्याच स्टाईलचे नवे ॲप गुगल प्लेस्टोअरवर उपलब्ध झाले असून त्याचीच सध्या सोलापूरमध्ये चलती आहे. सीसीएचचा गंडा माहीत असतानाही या नव्या ॲपमध्ये गुंतवणुकीचा फंडा जोरात सुरू झाला आहे.

### ■ कशासाठी..? जिथे हरवले... तिथेच शोधण्यासाठी...

कोणी कर्ज काढून, कोणी घरातले दागदागिने विकून, कोणी जागा-घर गहाण ठेवून पैसा उभा केला आणि सीसीएचमध्ये गुंतवला. शेवटच्या टप्प्यात ज्यांनी गुंतवणूक केली; विशेषत: त्यांचीच फसवणूक झाली. त्यांनी जे सीसीएचमध्ये हरवले आहे; ते शोधण्यासाठी तेच लोक या नव्या ॲपमध्ये उतरले आहेत. जिथे हरवले; तिथेच शोधायचे ही या लोकांची मानसिकता आहे.

### ■ सुरुवातीला पैसे मिळतात हा समज

सीसीएच ॲपचा धुमाकूळ साधारण सहा महिन्यांपासून सुरू होता. म्हणजेच सहा महिने सीसीएचमधून परतावा मिळत होता. त्यावर अनेकजण श्रीमंत झाले. त्यानंतर सीसीएच शटडाऊन झाले. आता नव्याने आलेल्या ॲपमधूनही सुरुवातीला पैसे मिळतील. सुरुवातीलाच फसवणूक होणार नाही; म्हणून नव्या ॲपमध्ये सोलापूरकर डोळे झाकून गुंतवणूक करताना दिसत आहेत.



शेतकऱ्यांची दिवाळी गोड

## १०७ कोटींचा निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वर्ग

**दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर होणार जमा**

**सोलापूर** : सोलापूर जिल्ह्यात जून आणि ऑगस्ट दरम्यान मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टी झाली होती. बार्शी अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीचा पंचनामा करून १०७ कोटींचा प्रस्ताव प्रशासनाने शासनास सादर केला होता. त्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे मंगळवारी १०७ कोटींचा निधी जिल्हा प्रशासनाकडे जमा झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी वर्ग केला आहे.

दिवाळी पूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यात गेल्या महिन्यात मोठा पाऊस झाला होता. ६५ मिलिमीटर पेक्षा जादा पाऊस झाला होता. यामध्ये तीन तालुक्यात मोठे नुकसान झाले होते. उभ्या पिकामध्ये पाणी उभे राहिल्याने नुकसान झाले होते. सोयाबीनला जास्त फटका बसला होता. शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले, काहींची पिके वाहून गेली. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या वतीने पंचनामे केले. पहिल्या टप्प्यातील ४० कोटींचा निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला. त्यानंतर ऑगस्ट पर्यंत अतिवृष्टी झाली होती. दक्षिण सोलापूर, मंद्रूप आणि तालुक्यातील एक लाख १३ हजार ८६४ शेतकऱ्यांच्या ७४ हजार ४४६ हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले होते. यामध्ये ७०३०४ हेक्टर जिरायत, ३८९२ बागायत तर २४९ हेक्टर फळपिकांचा समावेश आहे. त्यासाठी नुकसानभरपाई म्हणून जिल्हा प्रशासनाच्या वतीने १०७ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला होता. या प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून निधी आला आहे. मंगळवारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर वर्ग करत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया चालू आहे.



शेतकऱ्यांच्या खात्यात दिवाळीपूर्वी रक्कम वर्ग करण्याचा प्रयत्न असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. बार्शी तालुक्यातील ६६ हजार २९ शेतकऱ्यांचे ४४१२२ हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाले असून ६३.७२ कोटी, दक्षिण सोलापुरातील १०५७३ शेतकऱ्यांचे ७९६० दे. क्षेत्रावर नुकसान झाले असून १२ कोटी, अपर मंद्रुप ८७९ शेतकऱ्यांचे १०४२ हेक्टर क्षेत्रावर नुकसान १ कोटी ५७ लाख, अक्कलकोट तालुक्यातील ३६ हजार ३८३ शेतकऱ्यांचे २१ हजार ३२१ हेक्टरवर नुकसान झाले आहे. त्यासाठी २९ कोटी ७० लाख रुपयांची मदत मंजूर झाला आहे.

## कराटे शिक्षकाची हॉटेलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : कराटेचे प्रशिक्षण देणाऱ्या एका ४२ वर्षीय शिक्षकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना केगाव येथील नाईट क्वीन हॉटेल येथे सुमारास उघडकीस आली.

संजय सुभाष साबळे (वय ४२ रा.हिरज ता.उत्तर सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या शिक्षकाचे नाव आहे. तो केगाव येथील जुने जय मल्हार बार येथील खोलीत राहण्यास होता. आज मंगळवारी सकाळी त्याचा मृतदेह दुसऱ्या मजल्यावरील खोलीतल्या छताच्या पंख्याला कमरेस बांधण्याच्या कापडी पट्ट्याने(ब्लॅक बेल्ट) गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत संजय साबळे यांच्या पश्चात आई-वडील आणि दोन मुले असा परिवार आहे.

तो बाळे परिसरात कराटेचे क्लास घेत होता अशी माहिती पोलिसांनी दिली. त्याने आत्महत्या का केली हे मात्र अद्याप समजले नाही. पुढील तपास हवालदार दराडे करीत आहेत.



**आली दिवाळी...** दिव्यांचा सण अशी ओळख असणाऱ्या दिवाळीसाठी अशा रंगीबेरंगी आकाशदिव्यांची बाजारात झालेली रेलचेल.

## अंगावर वीज पडून ३ मजुरांचा मृत्यू

सुराज्य/नांदेड



जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील धावरी येथे आज दुपारी ४ वाजताच्या सुमारास ऊस तोडणीचे काम सुरू असताना ऊसतोड कामगारांच्या अंगावर वीज पडून तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाला तर एक १७ वर्षीय तरुणी गंभीर जखमी झाली आहे.


गेल्या आठ दिवसापासून लोहा तालुक्यासह परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. आज दुपारी देखील विजेच्या कडकडाटसह पावसाला सुरुवात झाली. यात धावरी येथील ऊसतोड कामगार काम करत असताना त्यांच्या अंगावर वीज कोसळली. या घटनेत तीन जण जागीच ठार झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच लोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे पोलीस कॉन्स्टेबल अशोक केंद्रे ,सचिन गिरे यांनी शेतात जाऊन घटनेचा पंचनामा केला. घटनास्थळी तहसीलदार, नायब तहसीलदारांनी भेट दिली. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## अल्पवयीन तरुणीला पळवून नेऊन अत्याचार

### दोघांना ३ दिवसांची कोठडी

सुराज्य/सोलापूर

एका अल्पवयीन तरुणीला पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार करीत गर्भवती केल्याची घटना जोडभावी पेठ परिसरात घडली. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी आणि त्याला सहकार्य करणाऱ्या एका महिलेसह चौघांविरुद्ध पोक्सो अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल केला. त्यापैकी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांना ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने आज मंगळवारी दिला.



अभिषेक शाहूराज कांबळे (वय २४), त्याला मदत करणारे विनोद भारत डावरे (वय ३६), कोमल देविदास कांबळे(सर्व रा. मड्डीवस्ती) आणि महादेव कांबळे (रा.उमरगा) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. त्यापैकी अभिषेक आणि विनोद डावरे याला पोलिसांनी अटक करून २१ ऑक्टोबर पर्यंतची पोलीस कोठडी घेतली. ती अल्पवयीन तरुणी एप्रिल महिन्यात आजीकडे गेली होती.त्यावेळी अभिषेक कांबळे हा तिला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेला. आणि तिच्यावर मड्डीवस्ती आणि उमरगा येथे नेऊन अत्याचार केला. त्यात ती गर्भवती राहिली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पीडीतेच्या आईने नुकतीच जोडभावीपेठ पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास महिला फौजदार व्हट्टे या करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**या पावसाळ्यात 'ही' टिकेल असं वाटलं होतं!!**

| कल्याण |
|---|
| --------- |


| मेन बाजार |
|---|
| --------- |

## खा.निंबाळकरांनी दिला विभागीय रेल्वे मंडळाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

सुराज्य/सोलापूर

कोरोनानंतर रेल्वे थांबे पूर्ववत करावे आणि इतर मागण्या खासदार मंडळींनी केल्या असता रेल्वे अधिकारी यांचा मनमानीपणे कारभार सुरू आहे. या मनमानीला कंटाळून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सोलापूर विभागीय रेल्वे मंडळाचे अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

भाजप खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी राजीनामा दिला आहे. रणजितसिंह नाईक निंबाळकर हे सोलापूर विभागीय रेल्वे मंडळाचे अध्यक्ष आहेत, तर ओमराजे निंबाळकर या समितीचे सदस्य आहेत. या दोघांच्या तडकाफडकी दिलेल्या राजीनाम्यांची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. रेल्वे समितीच्या बैठकीत आज प्रशासन आणि समितीची सदस्य असलेले खासदार यांच्यामध्ये मोठा वाद झाला. त्यामध्ये अध्यक्षांसह इतर खासदारांनीही आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. पुण्यात झालेल्या रेल्वे विभागाच्या बैठकीत वाद झाल्यानंतर रेल्वे विभागीय समितीचे अध्यक्ष खासदार रणजीत निंबाळकर यांच्यासह सदस्य असणाऱ्या खासदारांनी राजीनामे दिल्याने खळबळ उडाली आहे.



कोरोनापूर्वी ज्या स्थानकावरती रेल्वे थांबा होता, असे सर्व पूर्वरत करावे. थांबा मिळावा, लोकांची गैरसोय थांबावी, विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी यांचे प्रश्न सुटावेत, भुयारी मार्ग, आणि दोन गावांना जोडणारे रस्ते जे रेल्वे अधिकार क्षेत्रात येतात ते दुरुस्त करावेत, कुर्डूवाडी रेल्वे डब्याचा कारखाना चालू रहावा, अशा मागण्या खासदारांनी केल्या होत्या. तसेच स्टेशन सुविधा आणि सुधारणा, किसान रेल यासाठी वारंवार रेल्वे अधिकाऱ्यांना सांगूनही हे प्रश्न सुटत नसल्याने या बैठकीत लोकप्रतिनिधी आणि रेल्वे बाबू यांच्यात जोरदार घमासान झाले. या बैठकीला विभागीय अध्यक्ष असणारे खासदार रणजीत निंबाळकर हे भाजपचे खासदार आहेत.

या बैठकीस खा. ओमराजे निंबाळकर, खा. जयसिद्धेश्वर स्वामी, खा. उमेश जाधव, खा. श्रीरंग बारणे, खा. श्रीनिवास पाटील, खा. धैर्यशील माने, खा. हेमंत पाटील, खा. धनंजय महाडिक, रेणू शर्मा तथा निलेश ढोरे उपस्थित होते.

### खासदार रणजितसिंह निंबाळकर काय म्हणाले

वारंवार मागणी करूनही रेल्वे बोर्ड सदस्य असणाऱ्या खासदारांच्या मागणीला किंमत देत नसल्याने या रेल्वे मंडळाचा अध्यक्ष म्हणून राजीनामा देत आहोत, असे खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी सांगितले. तसेच यापुढे रेल्वे मंडळाच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# अतिरिक्त उसाचा प्रश्न

राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी झाली.रब्बी हंगामही लांबण्याची चिन्हे दिसत आहेत.कारण अजूनही पाऊस पाठ सोडत नाहीय.खरीप व रब्बी हंगामातील किराणा शेतमालाची अवस्था बिकट असतानाच उसाचा प्रश्नही गंभीर होण्याची चिन्हे दिसत आहेत.कारण पाऊस पडल्याने उसाची वाहतूक ठप्प झाली आहे.तिकडे कारखान्यांचे पट्टे पडले आहेत.कारखाने सुरू झाले मात्र गाळपासाठी अजूनही ऊस येत नाहीय.दिवाळीपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवली गेल्याने कारखान्यांमधून प्रत्यक्षात साखर कधी पडेल,याची शाश्वती देताच येत नाही. गेल्यावर्षीच्या हंगामात अतिरिक्त उसाचा प्रश्न चिंतेचा विषय बनला होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर शेतातील उभा ऊस पेटवून देण्याची वेळ आली होती. मात्र यंदाही अतिरिक्त उसाच्या प्रश्न पेटण्याची शक्यता आहे. कारण प.महाराष्ट्र व औरंगाबाद विभागात नव्याने सुरू होणाऱ्या गाळप हंगामासाठी गाळप होणाऱ्या उसाचे क्षेत्र हे सरासरी २० पेक्षा अधिक टक्क्यांनी वाढले आहे. त्यामुळे यावेळी सुद्धा अतिरिक्त उसाचा प्रश्न शेतकऱ्यांची आणि कारखानदारांच्या चिंतेत भर पाडणार असल्याची शक्यता वर्तवली गेलीय,ती चुकीची ठरवता येणार नाही.कारण पावसामुळे जी दलदल निर्माण झाली आहे,त्याने शेतापर्यंत वाहने जावूच शकत नाहीत.रस्ते कधी वाळतील याचा नेम नाही.त्यामुळे कारखान्यांना ऊस पुरवठ्याचा प्रश्न बरेच दिवस लटकत राहाणार आहे.ऊस वेळेवर नाही गेला तर टनेज मार खाते आणि पर्यायाने म्हणावा तसा दर मिळत नाही. कारखान्यांना उशीरा ऊस पुरवठा झाला तर पुढे मे -जूनपर्यंत



हंगाम चालू शकतो.त्याने देखील ऊस उत्पादकांना मोठा फटका बसू शकतो आणि त्यातून कारखाने देखील सुटू शकणार नाहीत.कारण रिकव्हरी वाढली तरच कारखाने फायद्यात येवू शकतात. हे साखर कारखानदारीचे गणित आहे. सन २०२०-२०२१ च्या हंगामातील ऊस हा २०२१-२०२२ च्या गाळप हंगामासाठी उपलब्ध झाला होता. तर यावेळी उसाची नोंद घेताना साखर कारखाने आणि कृषी विभाग यांच्या माहितीत मोठी तफावत आढळून आली होती. दरम्यान यावेळी अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण झाला होता. अनेक शेतकऱ्यांनी ऊस शेतातच पेटवून दिला होता,तर काही ठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना समोर आल्या होत्या. १५ ऑक्टोबरपासून राज्यात गाळप हंगामाची सुरवात झाली आहे. तर अनेक कारखान्यात अजूनही गाळपला सुरवात झालेली नाही. मात्र गेल्यावर्षीचा अनुभव पाहिला तर शेवटपर्यंत ऊसतोडीसाठी मजूर मिळत नव्हते. त्यामुळे यंदाच्या हंगामातही गेल्यावर्षीप्रमाणे ऊसतोडीसाठी मजूर न मिळणे, हार्वेस्टर उपलब्ध नसणे, उशिरा ऊसतोड झाल्याचा शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागणे, आदी अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आत्तापासूनच यासाठी नियोजन करण्याची मागणी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.पण अस्मानी परिस्थिती अशी ओढवली आहे की-त्यावर आता कुणीच उपाय करू शकणार नाही.यामागचे कारण सूक्षपणे शोधण्याची गरज आहे.गावागावातील शेत रस्ते अजूनही मजबूत झालेले नाही.त्याकडे जिल्हा नियोजन समिती वा ग्रामपंचायतींचे लक्ष नाही.देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी ग्रामीण रस्त्यांची बोंब कायम आहे.अशा रस्त्यांना वेळेवर निधी मिळत नाही.रस्ते मजबूत झाल्याखेरींज शेतमालाची वाहतूक सुरळित होणार नाही.अतिरिक्त उसाप्रमाणे साखरेचाही प्रश्न जटिल होणार आहे. देशात मोठ्या प्रमाणावर साखरेचं उत्पादन झाले आहे. जगातील सर्वात मोठा साखर उत्पादक आणि सर्वाधिक ग्राहक असलेला देश म्हणून भारत उदयाला आला आहे. साखर निर्यातीत भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. आतापर्यंतची सर्वाधिक म्हणजे १०९.८ लाख मेट्रीक टन साखरेची विक्रमी निर्यात करण्यात आली आहे. तसेच इथेनॉल उत्पादनासाठी ३५ लाख मेट्रीक टन साखरेचा वापर करण्यात आला. इथेनॉल विक्रीतून साखर कारखान्यांना आणि डिस्टिलरींना १८ हजार कोटींचं उत्पन्न मिळाले आहे.साखर हंगाम २०२१-२२ मध्ये ३५९ लाख मेट्रीक टन साखरेचे उत्पादन झाले आहे. यामध्ये आतापर्यंतची सर्वाधिक म्हणजे १०९.८ लाख मेट्रीक टन साखरेची विक्रमी निर्यात करण्यात आली आहे. २०२१-२२ हंगामातील आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही आर्थिक साहाय्याशिवाय आत्तापर्यंतची सर्वाधिक म्हणजे सुमारे १०९.८ एलएमटी इतकी विक्रमी साखर निर्यात झाली. आधारभूत आंतरराष्ट्रीय किंमती आणि भारत सरकारच्या धोरणामुळे भारतीय साखर उद्योगाने हे यश साध्य केलं आहे. या निर्यातीतून देशासाठी ४० हजार कोटी रुपयांचे परकीय चलन प्राप्त झाले आहे.साखर कारखानदारींचा देशाला कसा फायदा आहे हे यावरून लक्षात येईल.

सामाजिक

# फुकट योजनांचा परिणाम चिंताजनक

जीएचआयच्या माध्यमातून जागतिक, क्षेत्रीय तसेच राष्ट्रीय पातळीवर उपासमारीच्या परिस्थितींवर लक्ष ठेवले जाते व त्यातून दरवर्षी जागतिक भूक निर्देशांक जाहीर केला जातो. यावर्षीच्या भूक निर्देशांकाने भारतात चिंताजनक व वाईट परिस्थिती सांगितली. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ व श्रीलंका यांच्यापेक्षाही वाईट परिस्थिती असल्याचे वास्तव निर्देशांकातून समोर आले आहे.

१२१ देशाच्या यादीत भारताचे स्थान १०१ वरून घसरून १०८ वर पोहोचले आहे. एवढेच नव्हे तर बालकांच्या उंचीवर आधारित कमी वजनाचा दर म्हणजे अल्पपोषण दर सर्वाधिक १९.३ असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. जागतिक भूक निर्देशांक यादी तयार करण्यासाठी प्रामुख्याने चार महत्त्वाचे निकष आधारभूत मानले जातात. यामध्ये कुपोषण, पाच वर्षांच्या खालील मुलांना त्यांच्या उंचीच्या तुलनेत किती कमी आहार मिळतो, पाच वर्षांच्या खालील किती मुलांची त्यांच्या वयाच्या तुलनेत उंची कमी आहे आणि दरहजारी आकड्यामागे पाच वर्षांखालील किती मुलं दगावतात या निकषांच्या आधारे जागतिक भूक निर्देशांकाची मांडणी केली जाते. या अहवालात जी गणना करण्यात आलेली आहे, त्यामध्ये चार निर्देशांक पद्धती वापरण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी तीन या मुलांच्या आरोग्याशी संबंधित आहेत. छोट्या प्रमाणात घेतलेले नमुने हे भारताच्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करू शकत नाही असे असले तरीही ही गोष्ट चिंताजनकच आहे याला कारणीभूत लोकसंख्या.

असे अहवाल, आकडेवारी समोर आली की दोन-तीन दिवस चर्चा करून लोकसंख्येवर ढकलून मोकळे होतो. पण खरेच बालकांचे कुपोषण, उपासमार, खुलेपणा तसेच अल्पपोषणासारख्या वास्तविक मुद्द्यावर चर्चा करून कायमचा तोडगा काढला नाही. प्रत्येक वेळी निवडणुका आल्या की राजकीय पक्षांचा जाहीरनामा पहा. त्यात मोफत या प्रकारात मोडणाऱ्या घोषणाच असतात. त्या कुठल्याही प्रकारचे नियोजन, राज्याची आर्थिक स्थिती याचा विचार न करता केल्या जात असल्याचा अनुभव मागे दिसून येते. ही आकडेवारी पाहून मला आश्चर्य वाटते. कारण जगातील कोणत्याही देशात जे फुकट दिले जात नाही त्या सर्व गोष्टी भारतात फुकट दिल्या जातात. त्यामध्ये सर्वात मोठी अन्नसुरक्षा योजना. एका कुटुंबाला अगदी कमी किमतीत तांदूळ व गहू पस्तीस किलो दिले जाते. २०१९ पासून महिन्यात दोनदा मिळते.

ही योजना खेड्यापाड्यात चालू आहे त्यामुळे कुपोषण, उपासमारी कशी? शेतकरी कष्ट करून धान्य पिकवत आहेत आणि सरकार ते धान्य खरेदी करून लोकांना मोफत देत आहे. तरीही उपासमार. शाळेमध्ये शाळेतील किंवा शाळाबाह्य मुलांना पोषण आहार दररोज दिला जातो. सरकारतर्फे शिक्षण, गणवेश, वह्या पुस्तके आणि जेवण मोफत मिळतेच शिवाय मुख्यमंत्री श्रम कार्डद्वारे दरवर्षी पैसे सुद्धा मिळतात. मुलीला सायकल, लॅपटॉप. जेंव्हा मुलगा महाविद्यालयात जाऊ लागेल तेंव्हा बीपीएलद्वारे मोफत प्रवेश आणि स्कॉलरशीप सुद्धा मिळते.

वृद्ध लोकांना वृद्धावस्था पेन्शन मिळतेय आणि एक रुपया किलो दराने तांदूळ मिळतात. तीर्थयात्रेस मुख्यमंत्री तीर्थयात्रा योजना आहेच. कुटुंबातील लोकांच्या आजारपणासाठी आयुष्यमान कार्डद्वारे पाच लाख रुपयांपर्यंत मोफत




उपचार मिळतात. आदर्श विवाह योजनेअंतर्गत श्रमकार्डद्वारे तीस हजार मिळतात आणि आंतरजातीय कन्यादान योजनेतून अडीच लाख रुपये मिळतात. जननी सुरक्षा योजनेत प्रसूती मोफत असतेच शिवाय पंधराशे रुपयांचा धनादेश मिळतोच आणि श्रमकार्ड योजनेत भगिनी प्रसूती योजनेद्वारे वीस हजार रुपये मिळतात. फुकट घरे, मोफत वीज, मोफत गॅस कनेक्शन अशा अनेक गोष्टी अनेक कारणाने सरकार लोकांना देत आहे तरीही भारतात जगाच्या तुलनेने २२.४३ कोटी कुपोषित आहेत. हा अहवालामधील आहे.

परंतु लोकसंख्या, फुकट दिलेल्या गोष्टी पहाता हा आकडा खूपच मोठा आहे. तसेच ऑक्सफॅमच्या अहवालानुसार, जगात दर मिनिटाला किमान ११ लोक उपासमार आणि मरत आहेत. शासन पूर्णपणे कुपोषण व उपासमारी कमी करण्यासाठी प्रयत्न करत असले तर शासकिय, खाजगी कर्मचारी, संस्था सामान्य माणसांपर्यंत त्या सुविधा मिळतात का याची खात्री केली जात नाही.

नीती आयोगानुसार, भारतातील २५ टक्के लोकसंख्या गरीब आहे, अर्थात एकूण लोकसंख्येपैकी प्रत्येक चौथा माणूस गरिबीत आहे. जगातील सर्वात मोठी अन्नसुरक्षा योजना भारतात रेशन दुकानाच्या माध्यमातून लोकांना दिली जाते. परंतु बऱ्याच लोकांना धान्य मिळत नाही. त्याचे पुढे काय होते माहीत नाही. मग दोषी कोण? हा संशोधनाचा विषय होईल.

या जीएचआयच्या निर्देशांकात असे ही म्हटले की युद्ध, संघर्ष, वातावरण बदल, कोरोना महामारीनंतरचे आर्थिक संकट आणि देशाची उदासीनता कुपोषण, उपासमारीचे संकट येत्या काळात गंभीर होईल, अशी निर्देशांकात चिंताही व्यक्त केली आहे.

जगात फक्त तेच देश विकसित झाले आहेत ज्यांनी शिक्षण, आरोग्य, रोजगार यांना प्रोत्साहन दिले आहे आणि या गोष्टी चांगल्या जीवनमानासाठी आणि गरिबी निर्मूलनासाठी सर्वात महत्त्वाच्या आहेत. भारतात एवढ्या गोष्टी फुकट देऊनही कुपोषण किंवा उपासमारीची आकडेवारी चिंताजनक नाही का?

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज.**

टुडेज् ब्लॉग

# भारत जोडो यात्रा

**कधी तो पावसात भिजत भाषण करतोय, कधी तो रस्त्यावर उभ्या असलेल्या बैलगाडीतून ऊस काढून खातोय. तर कधी सिद्धरामैयांना सोबत घेऊन पळतोय तर कधी DK शिवकुमार यांना. राहुल गांधींची पदयात्रा सुरु होऊन आता जवळपास दीड महिना होऊन गेला. जवळपास हजार किलोमीटरच्या आसपास या पदयात्रेने आजपर्यंत प्रवास केला आहे. कर्नाटक ओलांडेपर्यंत ही पदयात्रा १००० $KM^2$ चा टप्पा पूर्ण करेल. पदयात्रा सुरु होताना कोणीच अपेक्षा केली नव्हती की राहुल गांधी एवढे चालतील. पण ते चालले, रोज चालत आहेत. ३० सप्टेंबरला यात्रेने केरळमधून कर्नाटकमध्ये प्रवेश केला. कर्नाटक काँग्रेसने जंगी सभा अन् कार्यक्रम घेऊन राहुल गांधी यांच्या हातात तिरंगा देऊन प्रवासाला सुरुवात केली.**

२ ऑक्टोबरला गांधी जयंती रोजी भर पावसात राहुल गांधींनी दिलेले भाषण प्रचंड viral झाले. यात महत्वाची गोष्ट अशी होती की राहुल पावसात भाषण करत असताना समोरची पब्लिक आसनव्यवस्था म्हणून असलेल्या खुर्च्या आपल्या डोक्यावर उलट्या धरून पावसापासून बचाव करत ते भाषण ऐकत होती. कोणी पाऊस येतोय म्हणून उठून गेले नाही.

एके ठिकाणी कोविडने घरातील कर्ताधर्ता मृत्यू पावलेल्या परिवारातील महिला-मुली यांचा राहुल यांच्याशी संवाद ठेवलेला. त्यात एक चिमुकली राहुल यांच्या जवळ आली अन् म्हणाली 'माझे बाबा असताना मी त्यांना जे मागेल ते आणून द्यायचे, माझ्यासाठी शाळेच्या वस्तू आणायचे पण आता माझी आई मला काही आणून देण्यास असमर्थ ठरतेय, कोविडमध्ये वेळेवर ऑक्सिजन न मिळाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय मदत वेळेवर न मिळाल्याने माझ्या बाबांचा मृत्यू झाला. मला कोणी शिक्षणास मदत केली तर मी डॉक्टर होऊन दाखवेन.' हे ती सांगत असताना अनेकांच्या डोळ्यात अश्रू होते. राहुल यांनी कर्नाटक प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांना मुलीच्या शिक्षणाला मदत करण्याचे सांगितले. अशा अनेक कथा तेथील महिला सांगत होत्या. राहुल गांधी यांनी कर्नाटक राज्य सरकारकडे यांच्या मदतीसाठी सरकार काय उपाययोजना करू शकेल? याबद्दल प्रश्न उपस्थित केले.

दसऱ्या दरम्यान दोन दिवस पदयात्रेने मुक्काम घेतला. आपल्याकडे कोल्हापूरला जसा शाही दसरा होतो. तसाच काहीसा दसरा मैसूरला होतो. अनेक पर्यटक दसऱ्यात खास मैसूर पॅलेस पहायला येतात. यावेळेस सोनिया गांधी पण दसरा पाहायला मैसूरला आल्या. सुट्टीच्या त्या दिवशी सोनिया, राहुल अन् काहीजण नागरहोल व्याघ्र प्रकल्प पाहण्यास गेले. कोडगू अन् मैसूर या दोन जिल्ह्यात पसरलेला हा प्रकल्प आहे. यावेळेस राहुल गांधी यांनी एका



हत्तिणीसोबत तिच्या जखमी पिल्लाला पाहिले. त्याचे त्यांनी ट्विट केले. सफारीवरून आल्यावर त्यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री बोमण्णा यांना पत्र लिहून त्या पिल्लाला वैद्यकीय उपचार लवकर मिळावेत अशी विनंती केली.


मुख्यमंत्र्यांनी सुद्धा ताबडतोब राहुल गांधींच्या पत्राची दखल घेत आपल्या वनविभागाला मदतीचे आदेश दिले. दुसऱ्या दिवशी तज्ज्ञ, डॉक्टरांचे पथक तिथे पोहचून त्यांनी त्या पिल्लावर वैद्यकीय उपचार केले. असेच बदनावालू या गावात दोन समाजात निर्माण झालेल्या तेढीमुळे या गावातील एक रस्ता १९९३ पासून बंद होता. जवळपास तीन दशकांपासून बंद असलेला हा रस्ता राहुल गांधी यांच्या पुढाकाराने सुरु झाला. रंगीबेरंगी टाईल्स लावून या रस्त्याचा शुभारंभ राहुल गांधींच्या हस्ते झाला. या गावातील शाळेतील एका भिंतीवर राहुल गांधी यांनी आपल्या हाताचे ठसे उमटवले. या रस्त्याला 'भारत जोडो' असे नाव देण्यात आले. पदयात्रेत लोकं स्वयंस्फूर्तीने सामील होताहेत. हे या यात्रेचे खऱ्या अर्थाने यश आहे. लहानांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सगळी लोकं यात सहभागी होताहेत. भारत कधी तुटला? असे कुत्सितपणे म्हणणाऱ्या लोकांसाठी ही खऱ्या अर्थाने सणसणीत चपराक म्हणावी लागेल.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. प्रत्येक राज्याची, धर्माची विशेषतः आहे. राहुल गांधी ही विविधता एककल्ली अजेंडा राबविणाऱ्या केंद्र सरकारला आणि पर्यायाने लोकांना यात्रेतून दाखवत आहेत. राहुल गांधींच्या फिटनेसची सुद्धा कमाल म्हणावी लागेल. वयाच्या ५२ व्या वर्षी दररोज इतके चालणे ही काय सोपी गोष्ट नाही. याची परिसीमा म्हणजे परवा त्यांनी एका दिवसात तब्बल ४४ किमी अंतर पादाक्रांत केले. या यात्रेकडे लोक आशेने बघताहेत. पुढच्या वर्षी कर्नाटकात विधानसभेचा रणसंग्राम आहे. राहुल गांधींच्या यात्रेचा किती फरक पडला ते आपल्याला लवकरच कळेल. यात्रेला महाराष्ट्रात यायला अजून साधारण एक महिना लागेल.

**- वैभव कोकाट.**

बोधकथा

## जीवनाचे सत्य



एका नावेतून काही प्राध्यापक प्रवास करत होते. नाव पलिकडे जात असताना, एका प्राध्यापकाने नावाड्याला विचाटले, काय टे तुला गणित येतं का? नावाडी म्हणाला, 'गणित? माझा आणि गणिताचा काय संबंध?

यावर तो प्राध्यापक म्हणाला, 'गणित येत नाही? मग तुझं २५ टक्के आयुष्य वाया गेलं आणि थोडा वेळ गेल्यावर त्याच प्राध्यापकाने विचारले, तुला ज्योतिष तरी कळतं का? नावाड्याने नकारार्थी मान हलवून म्हणाला, 'नाही साहेब'.

प्राध्यापक म्हणाला, 'काय रे? तुला गणित येत नाही. ज्योतिष कळत नाही. तुझं ५० टक्के आयुष्य वाया गेलं.

अचानक वादळं आलं. सोसाट्याचा वारा सुटला. नाव हेलकावे खाऊ लागला. सगळे घाबरुन गेले. यावेळी नावाडी त्यांना म्हणाला, 'तुम्हांला पोहायला येतं? प्राध्यापक म्हणाला, 'नाही'. मग नावाड्याने उडी मारली आणि म्हणाला तुमचं शंभर टक्के आयुष्य वाया गेलं. मला पोहता येतं. जे व्यवहारात कामाचे नाही, ते तुम्हांला येतं; पण मला जीवनात उपयोगी असणाऱ्या कला येतात. हेच जींवनाचे सत्य आहे.

**तात्पर्य : जीवनाचे सत्य साध्या साध्या व्यवहारातून कळते.**

जन्म हा अखेरचा

## धर्माचारस्थल -१



एखाद्या फुग्यात हवा भरली की तो टम्म फुगतो आणि त्याला एक टाचणी टोचली की सारी हवा बाहेर पडते. केवळ एका छिद्रेमुळे फुग्यातली हवा बाहेर येते. मग आपल्या शरीराला तर नऊ द्वारे आहेत, नऊ छिद्रे आहेत. असे असताना देखील शरीरात इतकी वर्षे प्राण राहिलाच कसा? असे विचारवंतांना वाटते.

चाळीस-पन्नास वर्षे एका शरीरात प्राणवायूचे आत-बाहेर वाहणे चालू असते. तो एकदा नाकाबाहेर गेला आणि परत आलाच नाही तर? तर जीवनच संपून जाईल. शास्त्रे सांगतात की, दिवसातून २१,६०० वेळा प्राणवायू आत-बाहेर वाहत असतो. तो इतके वेळा का आत-बाहेर करतो, याचाही गंमतशीर विचार काही लोकांनी केला आहे. कधीतरी त्याला एकदा कायमचे बाहेर जायचेच असते. म्हणून तो बाहेर जाण्याची जणू 'रिहर्सल' करीत असतो. एकदा तो कायमचा बाहेर गेला तर शरीर 'प्रेत' होतो. **(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## रुचीहीन वाटचाल

जनमानस

मेक्सिको व थायलंड येथे झालेल्या दोन हत्याकांडात मोठी जीवितहानी झाली. आधुनिक काळात सारीच सरमिसळ होताना मोबाईल इंटरनेट टीव्ही या माध्यमांनी जीवनाचा ताबा घेतला असल्याचे जाणवते. सकस वाचन कमी होत आहे. या माध्यमातून जे काही वाचले, पाहिले, ऐकले जाते त्याचा दर्जा काय आहे? अभिरूचीहीन रचनेकडे वाटचाल होताना वैयक्तिक सामाजिक जीवनात आलेल्या आधुनिक प्रश्नांना उत्तरे सापडत नाहीत. प्रामाणिक योग्य मार्गाने जाणे हा विषय कालबाह्य होताना भलत्याच गोष्टींना महत्व येत आहे. माथेफिरू , संघटित गुन्हेगारी वाढताना सद्भावना सामंजस्य हे शब्द हरवताना हिंसा, मत्सर, द्वेष यांनी जीवनात केंव्हा प्रवेश केला हे समजत नाही. **- प्र. मु. काळे, नाशिक.**

# शतायुषी संख्याशास्त्रज्ञ : डॉ. शरदचंद्र श्रीखंडे

**संख्याशास्त्रांच्या प्रमेयांची नवी उकल करून आधुनिक विज्ञानशाखांचा रस्ता सोपा करणारे, जागतिक कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ डॉ. शरदचंद्र श्रीखंडे यांचा १९ ऑक्टोबर हा जन्मदिन.**

**लिओनार्द ऑयलर या अठराव्या शतकातल्या जागतिक कीर्तीच्या स्विस गणितज्ञाने १७८२ मध्ये केलेल्या लॅटिन चौरसाच्या उकलीतल्या मर्यादा, ज्या १७७ वर्षे कोड्यात टाकत होत्या, त्या १९५९ मध्ये डॉ. श्रीखंडे यांनी आर. सी. बोस आणि ई. टी. पार्कर यांच्यासमवेत स्पष्ट केल्याच्या महत्वपूर्ण घटनेची बातमी रविवार, २६ एप्रिल १९५९ रोजीच्या न्यूयॉर्क टाइम्सच्या पहिल्या पानावर आली होती. हे त्यांचे सर्वात महत्वाचे संशोधन. याशिवाय डॉ. श्रीखंडे यांनी शोधून काढलेला १६ शिरोबिंदू (व्हर्टायसेस), ४८ बाजू (एजेस्) आणि ६ डिग्री (प्रत्येक शिरोबिंदूला ६ बाजू येऊन मिळतात) असलेला 'श्रीखंडे आलेख' नावाने ओळखला जाणारा आलेख कोडिंग सिद्धान्त, क्रिप्टोग्राफी, नेटवर्क सिद्धान्त, प्रयोग संकल्पन किंवा अभिकल्प (डिझाइन ऑफ एक्सपेरिमेंट्स) आदी क्षेत्रात उपयोजित केला जातो. संख्याशास्त्रात भारताचे नाव उज्ज्वल करणारे डॉ. शरदचंद्र श्रीखंडे यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा थोडक्यात घेतलेला आढावा...**

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गणितज्ञ आणि संख्याशास्त्रात मोलाची भर टाकणारे भारतीय संख्याशास्त्रज्ञ डॉ. शरदचंद्र शंकर श्रीखंडे यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९१७ रोजी मध्यप्रदेशातील सागर येथे एका सामान्य कुटुंबात झाला. वडील शंकर आणि आई पार्वती यांचे पाचवे अपत्य असणारे डॉ. श्रीखंडे यांच्यासह सर्व मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे आणि डॉ. श्रीखंडे यांनी सर्व विषयात प्रथम यावे, अशी त्यांच्या वडिलांची इच्छा असायची आणि ते ती पूर्ण



ही करीत. त्यांचे शालेय शिक्षण सागर येथील सरकारी हायस्कूलमध्ये तर उच्च माध्यमिक शिक्षण रॉबर्टसन कॉलेज जबलपूर येथे झाले. त्यानंतर त्यांनी नागपूर येथील विज्ञान संस्थेतून मुलभूत गणित (मुख्य विषय) आणि उपयोजित गणित व भौतिकशास्त्र या दुय्यम विषयांत बी.एस्सी. (ऑनर्स) ही पदवी सुवर्णपदकासहीत संपादन केली. त्यानंतर नोकरीच्या शोधात ते भारतीय सांख्यिकी संस्थेमध्ये एक सांख्यिकी सहायक म्हणून दाखल झाले. येथे आर.सी.बोस, के. आर. नायर आदी समवेत वर्ष घालविल्यानंतर ते नागपूरच्या सरकारी विज्ञान कॉलेजमध्ये कायमस्वरूपी लेक्चरर म्हणून (१९४२) नोकरीस लागले. या ठिकाणी ते १९५८ पर्यंत विविध पदांवर कार्यरत राहिले.

दरम्यान, १९४६ मध्ये केंद्र सरकारने एका योजनेअंतर्गत त्यांची अमेरिकन विद्यापीठातील प्रशिक्षणासाठी निवड केली. त्यावेळी भारतीय कृषी संशोधन संस्थेतील संख्याशास्त्रज्ञ आणि सल्लागार डॉ. पी. व्ही. सुखात्मे यांनी त्यांना अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हेरॉल्ड हॉटेलिंग यांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला. यानुसार तेथे ते १९४७ मध्ये असोसियेट प्रोफेसर या पदावर रुजू झाले. तेथे त्यांना सुरुवातीला हर्ब रॉबिन्सन, डब्ल्यू. हॉफिडिंग आणि डब्ल्यू. सि. मेडो यांची आणि नंतर डॉ. आर. सी. बोस, एस.एन. रॉय, बहादूर, गोपीनाथ कल्लिनपूर आदी दिग्गज संख्याशास्त्रज्ञांची साथ मिळाली. या सर्वांनी तेथे संख्याशास्त्राला समृद्ध बनविण्याचे काम केले. तेथेच डॉ. आर. सी. बोस यांच्या स्फूर्तीदायक मार्गदर्शनाखाली डॉ. श्रीखंडे यांनी आंशिक संतुलित संकल्पनांची रचना आणि संबंधित समस्या (कन्स्ट्रक्शन ऑफ पार्शियली बॅलन्सड डिझाईन एंड रिलेटेड प्रॉब्लेम्स) या विषयात संशोधन करून वर्षभरातच प्रबंध सादर करून पी.एच.डी. पदवी प्राप्त केली. भारतात परत आल्यावर नागपूरच्या सायन्स कॉलेजमध्ये ते प्राध्यापक म्हणून काम करू लागले. १९५८ पर्यंत नागपूरमध्ये असताना संशोधनाच्या फारशा संधी न मिळाल्याने ते पुन्हा नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठात अभ्यागत प्राध्यापक म्हणून रुजू झाले.

१९५० पासून सुमारे ४० वर्षे डॉ. श्रीखंडे संशोधन लेख प्रकाशित करत राहिले. डॉ. श्रीखंडे यांचे निवडक शोधनिबंध कॅनडातल्या विनिपेग येथील चार्ल्स बॅबेज संशोधन केंद्राने 'सिलेक्टेड पेपर्स ऑफ एस. एस. श्रीखंडे' या पुस्तकात प्रकाशित केले आहेत. बॉस्टन येथील 'सायन्स म्युझियम'च्या गणित विभागात वर उल्लेखित केलेली ऑयलर समस्येच्या उकलेची नोंद आहे. ६२ वर्षांपूर्वी एप्रिल महिन्यातच त्यांनी ऑयलरचे अनुमान खोडून काढून सर्व जगाला थक्क केले होते. त्यांनी जीवनाचे शतक तर पूर्ण केलेच. त्यानंतर अडीच वर्षांनी २१ एप्रिल २०२० रोजी संध्याकाळी जेवण करून ते नेहमीप्रमाणे झोपी गेले आणि चिरनिद्रेच्या स्वाधीन झाले. यात डोळ्यांतून आसवे काढण्यासारखे काहीच नव्हते. आधीच्या दिवसापर्यंत त्यांनी सुडोकूचे कोडे सोडविले होते. त्यांची बुद्धी शाबूत होती. ते समाधानी आयुष्य जगले होते. पुढच्या पिढीतील लोकांना कल्पनाही करवणार नाही की, प्राध्यापक श्रीखंडे सरांसारखे उत्तुंग व्यक्तिमत्व या पृथ्वीतलावर शंभराहून अधिक वर्षे चालत फिरत होते. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन !

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# १५ नंतरच्या २२१ रोजंदारी कामगारांना कायम करण्यासाठी शासन स्तरावर हालचाली

## नियुक्त्यांबाबत जबाबदारी निश्चित करुन नियमितीकरणाचा प्रस्ताव पाठवण्याचे आदेश

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या आस्थापनेवर सन १९९५ नंतर रोजंदारी म्हणून कार्यरत असलेल्या २२१ सेवकांना विशेष बाब म्हणून सेवेत कायम करण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत.

दरम्यान, सन १९९५ नंतरच्या नियुक्त्यांबाबत नियुक्त्यांना जे अधिकारी जबाबदार आहेत, त्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या नियमितीकरणाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने शासनास पाठवावा. शासन त्यावर निर्णय घेईल, असे नगर विकास विभागाने पत्राद्वारे पालिका आयुक्तांना कळविले आहे. यामुळे लवकरच शेवटचे हे कर्मचारी देखील महापालिकेच्या सेवेत कायम होतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

शासनाच्या नगर विकास विभागाच्या प्राप्त झालेल्या लेखी आदेशानुसार सोलापूर महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून या रोजंदारी, बदली कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून सविस्तर अहवाल शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. मंगळवारी सायंकाळी शासनाच्या या आदेशासंदर्भात महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, काँग्रेस कमिटी कामगार सेल अध्यक्ष सायमन गट्टू , कार्याध्यक्ष योहान कानेपागुलु, खजिनदार अरुण म्हेत्रे, गौतम नागटिळक, राजेंद्र कोरे, श्रीनिवास रामगल या शिष्टमंडळाने आयुक्त पी. शिवशंकर यांची भेट घेतली. यावेळी कर्मचाऱ्यांनी सेवा निश्चिती




संदर्भात असलेली माहिती पालिका प्रशासनास सादर करावी अशा सूचना महापालिका आयुक्तांनी यावेळी युनियनच्या शिष्टमंडळास दिल्या.

आमदार प्रणिती शिंदे यांनी महापालिकेतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यासाठी सतत शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठपुरावा केला यावर बैठकाही झाल्या. महापालिकेच्या महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने अध्यक्ष बापू सदाफुले यांनी आमदार प्रणिती शिंदे यांच्या समवेत महापालिका प्रशासनाकडे प्रस्ताव व इतर बाबींसाठी प्रयत्न केले. २५ जानेवारी रोजी आमदार प्रणिती शिंदे आणि मुख्यमंत्री तथा तत्कालीन नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर या विषयावर बैठक झाली होती त्यावेळी विशेष बाब म्हणून या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचे आश्वासन दिले होते. यानुसार ही प्रक्रिया सुरू झाली आहे.

## त्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती कोणी केली माहिती नाही : आयुक्त

सुराज्य/सोलापूर

महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी शासनपत्राच्या आदेशानुसार महापालिका सामान्य प्रशासन विभागास आदेशातील सूचनांचे पूर्तता करण्याचे आदेश दिले आहेत. या रोजंदारी कामगारांची कोण नियुक्ती केली, हे माहिती नाही. काही कर्मचाऱ्यांची सेवा निश्चित केल्याची कागदपत्र व माहिती उपलब्ध नाही. या सर्व फायली गायब असल्याचे महापालिका आयुक्त पी. शिवशंकर म्हणाले.



१९९५ नंतर २२१ कर्मचारी लागू झाले. मात्र त्यांना कोणी नियुक्ती दिली, त्याचा कोणताही पुरवा दिला नाही. रोजंदारीवर कर्मचाऱ्यांना घेतल्यावर सहा महिन्यानंतर आयुक्तांची मान्यता घ्यावी लागते. मात्र तसे कोणतेही रेकॉर्ड उपलब्ध नाही आणि ते आता सापडण्याची शक्यता ही नाही. त्यामुळे उपलब्ध माहितीनुसार प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचेही आयुक्त शिवशंकर यांनी स्पष्ट केले.

### पालिका म्हणते केवळ ३६ लोकांच्या जबाबदारी निश्चितीचा अहवाल पाठवणार

सोलापूर महापालिकेकडे १९९५ नंतर असलेल्या एकूण २५७ कर्मचाऱ्यांपैकी २२१ कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली आहे. केवळ ३६ लोकांची जबाबदारी निश्चित करावयाची असल्या संबंधीचे अहवाल महापालिकेकडून पाठविण्यात येणार आहे. याशिवाय शासन निर्णयानुसार १९९५ पूर्वीच्या सेवकांना सामावून घेण्यासाठी पद निर्मितीस मान्यता देताना महापालिकेने आस्थापना खर्च ३५ टक्क्यांपर्यंत आणण्याचे दिलेले निर्देश तसेच या २२१ सेवकांना सामावून घेण्याच्या विचार करावयाचा झाल्यास सध्याचा महापालिकेचा आस्थापना खर्च व झाल्यानंतरचा आस्थापना खर्च याबाबत महापालिकेने स्पष्टता करणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले असून याचीही वेगळी स्पष्टता व अहवाल महापालिकेकडून सादर करण्यात येणार आहे.

## महापालिकेने काढले ३३ ठिकाणचे विनापरवाना केबल

सुराज्य/सोलापूर

शहरामध्ये मनमानी तसेच परवानगी न घेता लाईट पोल वरून केबल वायर टाकण्यात आल्या असून परवानगी न घेता टाकण्यात आलेले केबल वायर काढण्याची मोहिम महापालिकेकडून सुरू केली आहे. आतापर्यंत जवळपास ३३ ठिकाणचे केबलवायर काढण्यात आल्याची माहिती महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.

सोलापूर शहरात विविध केबल कंपन्यांना महापालिकेची परवानगी न घेता शहरामध्ये अनेक ठिकाणी लाईट पोलवर केबल टाकले आहे. केबल आणि इंटरनेटच्या वायरी आहेत. केबल वायर इतरत्र तुटून पडून रस्त्यावर अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यामध्ये शिस्त लागावी म्हणून महापालिका प्रशासनाने या केबल टाकण्यासाठी संबंधित कंपन्यांनी पालिकेकडे नोंदणी करण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर १६ जणांनी नोंदणीसाठी मागणी केली आहे. यापूर्वी चार कंपन्यांनी केबल वायर टाकण्यासाठी नोंदणी केलेले आहे.

महापालिकेच्या इलेक्ट्रिक विभागाचे प्रमुख राजेश परदेशी यांच्या पथकाने शहरातील विविध ठिकाणच्या लाईट पोलवर टाकण्यात आलेल्या केबल वायरची तपासणी मोहीम सुरू केली आहे. यामध्ये जवळपास १९९ ठिकाणची तपासणी करण्यात आली आहे. आतापर्यंत शहरातील ३३ ठिकाणच्या लाईट पोल वरील केबल वायर काढण्यात आले आहे.

यामध्ये नवी वेस पोलीस चौकी ते सरस्वती चौक, डफरीन चौक ते एम्प्लॉयमेंट चौक, एमआयडीसी, हरिभाई देवकरण प्रशालेच्या मागील मार्ग आदी ३३ ठिकाणच्या लाईट पोल वरील केबल वायरी काढल्या आहेत.

### १६ जणांनी केला नोंदणीसाठी अर्ज

महापालिकेच्या इशाऱ्यानंतर १६ जणांनी नोंदणीसाठी महापालिकेकडे मागणी केली आहे. चार कंपन्यांची नोंदणी प्रकिया पूर्ण झाली आहे. केबल कंपन्यांना महापालिकेकडे नोंदणी करावी, अन्यथा केबल कनेक्शन तोडण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

## गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

सुराज्य/सोलापूर : विंचूरतांडा (ता. दक्षिण सोलापूर) येथे राहणाऱ्या तानाजी महादेव बानुर (वय ३६) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना काल सोमवारी घडली. त्याला मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालय दाखल करण्यात आले. पत्नी आणि भावाच्या त्रासाला कंटाळून त्याने हा प्रकार केला. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.




### भोसरे येथे अपघात जखमीचा मृत्यू

भोसरे (ता. माढा) येथील आंबेडकर चौकाजवळ ट्रकच्या अपघातामध्ये जखमी झालेले संतोष वासुदेव भट (वय ५१ रा. भोसरे) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी दुपारी मरण पावले. १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या सुमारास ते एमएच१२- एनएक्स-९९२४ या ट्रकच्या धडकेने जखमी झाले होते. त्यांना कुर्डूवाडी येथे प्राथमीक उपचार करून सोलापुरात दाखल करण्यात आले होते. तालुका पोलीसात याची नोंद झाली आहे.

## शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंची फी माफ करा

### क्रीडा शिक्षकांची मागणी

सुराज्य/सोलापूर : महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर आयोजित द. भै. फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर या ठिकाणी मंगळवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी सोलापूर शहरातील क्रीडा शिक्षकांची सभा व ऑनलाइन संगणक प्रणाली प्रशिक्षण संपन्न झाले.

या क्रीडाशिक्षकांच्या बैठकीला व्यसासपीठावर जिल्हा क्रीडाधिकारी नितीन तारळकर, जिल्हा परिषद उपशिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, तालुका क्रीडाधिकारी श्रीमती सुप्रिया गावडे, म. न. पा. क्रीडाधिकारी शहापुरे, मुख्याध्यापक जितेंद्र पवार, क्रीडाधिकारी गणेश पवार, तालुका क्रीडाधिकारी सज़य वाळके, क्रीडाधिकारी धारुरकर शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष दशरथ गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पैगंबर जयंती मध्यवर्ती समितीतर्फे बक्षिसाचे वितरण

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर जश्ने ईद-ए-मिल्लादुन्नबी जुलुस कमिटीच्या वतीने पैगंबर जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या उत्कृष्ठ देखावे, मोहल्ला सजावट व वाहनावरील प्रतिकृती करणाऱ्या विजेत्या मंडळांना उद्योगपती सुधीर खरटमल यांचे शुभहस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महापौर ॲड. यु. एन. बेरिया होते. याप्रसंगी माजी महापौर आरीफभाई शेख, हाजी तौफिक हत्तुरे, तौफिक शेख, अखलाक दिना, इरफान शेख, मतीन बागवान, मुन्ना ईस्माईल शेख, समीर शेख, सलिम पामा, राजु हुंडेकरी, अशफाक टंगसाल आदी उपस्थित होते.

संस्थेने अत्यंत शांततेने व उत्कृष्टपणे जुलुस काढल्याबद्दल संस्थेच्या कार्याचा गौरव खरटमल यांनी केला. प्रेषित पैगंबर यांनी जगाला शांती, समता व बंधुत्वाचा संदेश दिला आहे असे उद्गार बेरिया यांनी यावेळी काढले.



यंदाच्या वर्षी सात रस्ता येथील युथ प्राईड ग्रुपचे समीर शेख, अप्सरा युथ फाऊंडेशनचे सोहेल चौधरी, फॉरेस्ट फ्रेंडस सर्कलचे इरफान शेख, स्टार ग्रुप कौंतम चौकचे मोहसिन मैंदर्गीकर व मोदी यंग स्टार ग्रुपचे सरफराज शेख यांना सजावटीसाठी तर शास्त्रीनगर, मिल्लत मोहोल्ला, नई जिंदगी ताज सोशल ग्रुप, आसार शरीफ शकील मौलवी ग्रुप व रंगरेज विजापूर वेस यांना उत्कृष्ठ देखावे व सजावटीसाठी तसेच वाहनावरील सजावटीसाठी रॉयल फ्रेंडस सर्कलचे शाहरुक पठाण, रिक्षावरील सजावटीसाठी सद्दाम मुल्ला व वसीम अंबीलखिंचडे यांना बक्षिसे देण्यात आली. इरफान शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### हिंडोळे परिवाराच्यावतीने

## अक्कलकोटमध्ये शंकर रेसिडेन्सी भक्त निवासाचे उद्घाटन

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट शहरात स्वामी भक्तांच्या सोई करीता हिंडोळे परीवाराच्यावतीने नव्याने बांधलेल्या शंकर रेसिडेन्सी या भक्त निवासाचे उद्घाटन खासदार. श्री ष ब्र डॉ जयसिध्देश्वर शिवाचार्य म्हास्वामीजींच्या दिव्यसानिध्यात व मातोश्री श्रीदेवी चनबसप्पा हिंडोळे व हिंडोळे परिवारातील सर्व जेष्ठ सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी माजी आमदार विजयकुमार देशमुख, माजी आ. सिद्रामप्पा पाटील, माजी आ. शिवशरण अण्णा पाटील, सिध्देश्वर कल्याणशेट्टी, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, भाजप नेते शहाजी पवार, सतीश पाटील वडकबाळकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख संजय देशमुख, नगरसेवक अशपाक



बळोरगी, ॲड. अनिल मंगरूळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक मुत्तू खेडगी, जिल्हा परिषद माजी पक्षनेता आनंद तानवडे, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, पंचमीया बंधू, तुकाराम बिराजदार, जयशेखर पाटील, राजू बंदीछोडे, सर्व नगरसेवक, व्यापारी, राजकिय, विधी व सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी उपस्थित राहून उद्योजक निलकंठ हिंडोळे व विद्यमान नगरसेवक, संजय गांधी निराधार योजना समितीचे माजी तालुका अध्यक्ष महेश हिंडोळे यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी निलकंठ हिंडोळे, नगरसेवक महेश हिंडोळे, निर्मला हिंडोळे, इरप्पा हिंडोळे, श्रीदेवी हिंडोळे, प्रतिभा हिंडोळे, चनबसप्पा हिंडोळे, बाबुराव हिंडोळे, कमला हिंडोळे, शिवशरण हिंडोळे, ज्योती हिंडोळे, विवेकानंद हिंडोळे आदी हिंडोळे परिवारातील सदस्य उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांना कार्यक्रमस्थळी हिंडोळे परिवार तर्फे प्रिती भोजन देऊन मानसन्मान करण्यात आला.



## चित्रकार अहेमद जकरिया यांच्यातर्फे खा. हेमामालिनी यांना चित्र भेट

सुराज्य/सोलापूर : भारतीय जनता पक्ष मथुरा लोकसभा मतदारसंघातील लोकप्रिय खासदार, भारत सरकार पद्मश्री पुरस्कार, फिल्मफेअर जीवन गौरव पुरस्कार, ज्येष्ठ राजकारणी, सर्वेत्कृष्ठ बॉलिवूड अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माता, भारतीय कला शास्त्रीय नृत्यांगना द ड्रीमगर्ल हेमामालीनी ७४ व्या वर्षात पदार्पण करत आहेत या खास प्रसंगी रविवार दिनांक १६ क्टोबर २०२२ रोजी नुकताच सोलापुर येथील चित्रकार महाराष्ट्र शासन द ग्रेट रेखांकन पुरस्कार विजयते, देओल परीवार यांचे खुप मोठे चाहत्यां पैकि एक अहेमद जकरीया यांनी वाढदिवसाची सुरमयी शुभेच्छा त्यांच्या मायानगरी मुंबई येथील निवास्थानी सदिच्छा भेटून पुष्पगुच्छ व साकारलेले चित्र सप्रेम भेट देऊन वाढदिवस खास पध्दतीने साजरा केले. त्या वेळी कार्यक्रम मध्ये सर्व देओल कुटूंबातील सदस्य व अनेक दिग्गज कलाकार मान्यवर उपस्थित होते.

## दिवाळीपूर्वी पगार व ॲडव्हॉन्स द्यावा; कॉलेज कर्मचारी युनियनची मागणी

सुराज्य/सोलापूर : राज्यातील महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा चालू महिन्याचा पगार येत्या दिवाळी सणापुर्वी करून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासनाने जाहीर केलेला साडेबारा हजार रूपयाचा ॲडव्हॉन्सही तात्काळ देण्यात यावा, अशी मागणी सोलापूर शहर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनने केली आहे. यंदा कोवीडनंतर प्रथमच दिवाळी सण आनंद आणि उत्साहात साजरा केला जाणार आहे. त्यामुळे दिवाळी साहित्य खरेदीसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा पगार दिवाळी सणापुर्वी होणे महत्वाचे असल्याचे युनियनचे सोलापूर जिल्हाध्यक्ष दत्ता भोसले यांनी म्हटले आहे. तसेच नुकतेच पुणे येथे झालेल्या बैठकीत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या आश्वासीत प्रगती योजनेसह सातव्या वेतनाचा प्रश्न नोव्हेंबर महिन्यात सोडविण्याचे आश्वासन दिले असल्याचेही त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी युनियनचे राजेंद्र गिडे, राहुल कराडे, आनंद व्हटकर, सिध्देश्वर स्वामी, अजीत संगवे, राजेंद्र गोटे इ. उपस्थित होते.

## गणेरी यांना एन. टी. रामाराव पुरस्कार जाहीर

सुराज्य/सोलापूर : नंदमुरी तारका रामाराव (एनटीआर) यांच्या जन्मशताब्दी विराभिमानी तिपण्णा गणेरी यांना एन. टी. रामाराव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. एनटीआर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त एन. टी. आर. कला परिषद (गुंटूर), आंध्रप्रदेश यांनी विविध कार्यक्रम व पुरस्कारांचे आयोजन केले आहे. यामध्ये कर्नाटक, ओरिसा, तमिळनाडू आणि महाराष्ट्र येथील प्रत्येकी एका एन. टी. आर. चाहत्यांना सदरच्या पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. यामध्ये सोलापूरमधील विराभिमानी तिपण्णा गणेरी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. स्मृती चिन्ह, शाल व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. राधा माधव नाट्यक्षेत्रम (गुंटूर), आंध्रप्रदेश येथे ६ नोव्हेंबर २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती सोलापूर शहर एन. टी. आर. अभिमान संगमचे कार्याध्यक्ष रामुलू पोतू यांनी दिली.



## रांगणा येथे व्यसनमुक्त युवक संघाचे दोन दिवसीय शिबीर

सुराज्य/वेळापूर : व्यसनमुक्त युवक संघ, महाराष्ट्र या संघटनेच्यावतीने रांगणा (ता. भुदरगड जिल्हा कोल्हापूर) या ठिकाणी युवकांसाठी दोन दिवसांचे जिल्हा शबिर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती राज्य व्यसनमुक्त युवक संघाचे अध्यक्ष दिपक जाधव यांनी दिली. सविस्तर वृत्त असे की, दिवसेनदिवस वाढत चाललेला व्यसनाचा प्रभाव व त्याला बळी पडणारी तरुण पिढी ही योग्य वळणावर यावी यासाठी गेली सुमारे पंचवीस वर्षांपासून जेष्ठ किर्तनकार ह भ प युवक मित्र बंडा तात्या कराडकर हे प्रयत्न करीत आहेत. व्यसनमुक्ती बरोबरच आध्यत्मिक व व्यवसायिक पध्दतीचे जीवनाचा मूलमंत्र या शिबिरातून युवक वर्गास दिला जातो छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्ले रांगणा हा अतिशय दुर्गम असून या ठिकाणी हे शिबिर १९ ते २० ऑक्टबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेले आहे. शिबिरात , , दिनांक १९ रोजी सकाळी साडेसात ते साडेआठ या वेळेत संत वाडमयातील व्यसनमुक्ती या विषयावर ह भ प केशव महाराज मुळीक हे चिंतन सांगणार आहेत त्या नंतर साडेनऊ ते साडेदहा चर्चासत्रात, व्यसनमुक्ती काल, आज आणि उद्या या विषयावर युवक आपले विचार व्यक्त करणार आहेत. या चर्चासत्राचे अध्यक्ष श्री आनंदराव निकम, कराड हे भूषविणार आहेत सकाळी ११ ते १२. ३०, या वेळेत किल्ले रांगणा या विषयावर महापारेषण चे आभियंता प्रमोद भापकर हे युवकांना संबोधित करणार आहेत त्यानंतर. सांप्रदायिक हरिपाठ असून संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत श्री संत तुकाराम महाराज यांच्या, , संकोचोनी काय झालासे लहान श्रघेई आपोशन ब्रम्हांडाचे श्रश्रया अभंगावर संतवीर ह भ प बंडातात्या कराडकर हे किर्तन करणार आहेत दुसऱ्या दिवशी सकाळी किल्ले रांगणा दर्शन असून संघटनेचे ट्रेकर श्री रविंद्र वीर युवकांना रांगणा किल्याची सर्व माहिती देणार आहेत. या दोन दिवसांच्या शिबिरासाठी कोणताही प्रवेश शुल्क संघटनेने आकरलेला नसून या शिबिरासाठी कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष संदीप पाटील हे सर्व उपाययोजना करींत आहेत येणाऱ्या युवकांनी १८ तारखेस मुक्कामी किल्ले रांगणा या ठिकाणी येण्याचे आवाहन दिपक जाधव यांनी केले आहे.

# मोडनिंबच्या शेतकऱ्याची डाळिंब दुबईला निर्यात

## एकेरी खोड पध्दतीने नाविन्यपूर्ण डाळिंब लागवडीचा अनोखा प्रयोग

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील डाळिंब बागेवर तेल्या, मर व इतर रोगामुळे मोठी घट होत असताना पुणे महामार्गावर मोडनिंब जवळील बैरागवाडी येथील शेतकऱ्याने एकेरी खोड पध्दतीने दाळिंब लागवड करून एक अनोखा प्रयोग प्रवीण माने यांनी यशस्वी केला आहे. कृषी पदविधर झाल्यानंतर चांगला शेतकरी होण्याचे स्वप्न असल्याने एक एकरांत डाळिंब लागवड केली. मोठा खर्चही केला. पण अपेक्षित यश मिळाले नाही. उलट ते अधिक आर्थिक अडचणीत आले. काहीसे खचले. पण हिंमत हरली नाही. त्यातून अनुभव वाढत गेला. डाळिंब शेतीसाठी हाच टर्निंग पॉइंट' ठरला. तेलकट डाग, मर रोग, खोडकिडी आदींवर प्रतिबंधात्मक उपाय करणे, लागवड अंतर कमी- जास्त करणे, मल्चिंग पेपरचा वापर आदी प्रयोग त्यांनी केलेत

तीन वर्षापूर्वी त्यांनी एकेरी खोड (सिंगल स्टेम) पध्दतीने लागवडीचा अनोखा प्रयोग करीत एकेरी खोड पध्दतीत सहा फुटांपर्यंत झाडाची उंची केली. लागवडीचे अंतर १० बाय ६ फूट असे घन पध्दतीचे ठेवले. पारंपरिक पध्दतीपेक्षा यात एकरी झाडांची संख्या जवळपास दुप्पटीने अधिक म्हणजे ७२६ पर्यंत झाली. या पध्दतीत नवव्या महिन्यात



बहर धरला व तेथून सहा महिन्यांनी फळ काढणी सुरू केली. या तंत्राद्वारे पहिले उत्पादन प्रति झाड १२, १४ ते १६ किलोपर्यंत मिळाल्याचे प्रवीण सांगतात.

### रोग प्रतिबंधासाठी पेपरचा प्रयोग

बागेवर प्लॅस्टिक पेपर आच्छादन प्रयोग केला. त्याशिवाय दोन झाडांमधील सहा फूट अंतरातील मध्यवर्ती तीन फुटांवर दीड फूट खोल व अडीच फूट रुंद चर खोदली. त्यात दोनशे मायक्रॉन जाडीचा प्लॅस्टिक पेपर उभा लावला. यामुळे दोन झाडांच्या मुळांचा एकमेकांना स्पर्श होत नाही. त्यामुळे मर सारख्या रोगाच्या प्रसाराला अटकाव तयार होतो असे ते सांगतात. ब्लोअर, ट्रॅक्टर, आधुनिक यांत्रिकीकरणाची जोड दिली आहे. सव्वा कोटी लिटर क्षमतेचे शेततळे उभारले आहे.

### राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राकडून सन्मान

विविध रोगांवर नियंत्रण, नवे प्रयोग, तंत्रज्ञान वापर, ऐन पावसाळ्यात मृग बहराचे प्रभावी नियोजन, संशोधकवृत्ती आदींची दखल सोलापूर येथील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राने घेतली आहे. त्यांचा अलीकडेच उत्कृष्ट डाळिंब उत्पादक पुरस्कार देऊन गौरव केला आहे. केंद्रातील शास्त्रज्ञांनी त्यांच्या बागेला भेट दिली आहे. शेतकऱ्यांना ते सातत्याने मार्गदर्शन करतात. त्यातून डाळिंब उत्पादकांचा मोठा समूह तयार झाला आहे.

### निर्यातक्षम उत्पादन

सातत्यपूर्ण निर्यातक्षम दर्जाचे उत्पादन घेण्याचे कसब तयार केले आहे. फळाचे वजन २०० पासून ७०० ग्रॅमपर्यंत भरते. स्थानिक बाजारात न विकता निर्यातदार व्यापाऱ्यांमार्फत बांगलादेश, दुबई या देशात डाळिंबांची निर्यात होते. एकरी ९, १० टनांपासून ते १५ टनांपर्यंत उत्पादनक्षमता तयार केली आहे. पूर्वी एकरी दीड लाख होणारा उत्पादन खर्च ६० ते ७० हजारांवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. किलोला ६५ रुपयांपासून १५०, २७० रुपयांपर्यंत दर प्रवीण माने त्यांच्या डाळिंबाला मिळतो.

### एकेरी खोड लागवडीचे तंत्र

यात झाडाची वाढ बुडापासून वरपर्यंत केवळ एकाच खोडावर केली जाते. झाडांचा गोल किंवा पसरट विस्तार होत नाही. ते सरळ वाढते. खाली अतिरिक्त फुटवे कमी निघतात. कीडनाशके थेट झाडावर पडतात. त्यांचे परिणाम चांगले मिळतात. * बुडात किंवा वरपर्यंत झाडांना कमी जखमा होतात. * सूर्यप्रकाश थेट खोडापर्यंत पोचतो. * झाडाला चांगले स्टोअरेज मिळते. फळांना एकसारखा आकार मिळतो. * छाटणीचा खर्च ५० टक्क्यांपर्यंत वाचतो. * आंतरमशागत सुलभरीत्या करता येते. * झाडांची एकरी संख्या जास्त असल्याने उत्पादनही वाढते. * फळांचे वजनही २०० ते ७०० ग्रॅमपर्यंत मिळते. * वाण भगवा. वर्षातून केवळ मृग बहार धरतात. मेमध्ये बाग ताणावर सोडली जाते. * तत्पूर्वी बागेची छाटणी केली जाते. त्यानंतर प्रतिझाड २० किलो शेणखत आणि पाच किलो कंपोस्ट खत. त्यानंतर बेड उकरून बेसल डोस. एक जूनला पानगळ. त्यानंतर बोर्डोची फवारणी. * पुढे गरजेनुसार बुरशीनाशके, कीटकनाशकांच्या फवारणीचे व पीकवाढीनुसार तसेच फळांना चकाकी री येणे, आकार यासाठी विद्राव्य खतांचे नियोजन. * दर पंधरवड्याने हंगामाच्या शेवटच्या महिन्यापर्यंत जिवामृत. एकरी २०० लिटर. * ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये फळांचे सेटिंग. सनबर्न होऊ नये यासाठी फळांना इंग्लिश कागद लावण्यात येतो. * नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात काढणीस सुरुवात.



## नॅचरल ब्ल्यु कोब्रा संस्थेच्या सर्पमित्रांना द रियल हिरो पुरस्कार

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, पहेणी, हिंगोली येथे आयोजित सर्पमित्र सन्मान सोहळ्यात सोलापूरच्या नॅचरल ब्ल्यु कोब्रा संस्थेच्या सर्पमित्रांना द रियल हिरो पुरस्काराने गौरविण्यात आले. जगविख्यात सर्पतज्ञ निलीमकुमार खैरे व डॉ संजय नाकाडे यांच्या वाढदिवसानिमित्त हा सोहळा हिंगोली येथील महावीर सभागृहात हिंगोली जिल्ह्याचे सर्पमित्र तथा माजी मानद वन्यजीव रक्षक विजयराज पाटील व मित्र मंडळ यांनी आयोजित केला होता. 'द रियल हिरो-सर्पमित्र' या विभागातून नॅचरल ब्लु कोब्रा संस्थेचे संस्थापक दीपक इंगळे, अध्यक्ष अनिल अलदार, अमोल बेट्टेगिरी, शशिकांत भंगुरे, ऋषी कापसे, अकबर बागवान, प्रवीण शेंडगे, अमित भगत, अमर वाघेला, यांना सन्मानित करण्यात आले. सापांवर विशेष अभ्यास करणाऱ्यांना महाराष्ट्रातील मोजक्या अश्या २० सर्प अभ्यासकांना 'द रियल हिरो सर्प अभ्यासक' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सोलापुर जिल्यातून 'द रियल हिरो - सर्प अभ्यासक' या पुरस्कारासाठी राहुल शिंदे यांची एकमेव निवड करण्यात आली. सर्पसंवर्धन या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना शूर तेजस्विनी पुरस्कार देण्यात आला. ट्रॉफी व सन्मान पत्र व बुके असे पुरस्काराचे स्वरूप होते. सर्प अभ्यासक देवदत्त शेळके, डॉ संजय नाकाड़े, हिंगोली जिल्याचे मानद वन्यजीव रक्षक डॉ श्रीधर कंदी यांनी मार्गदर्शन केले. हिंगोलीचे आमदार संतोष बांगर यांनी कार्यक्रमासाठी विशेष हजेरी लावत आपल्या भाषणामध्ये सर्पमित्रांच्या मागण्या शासनदरबारी मान्य करू असा शब्दही दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैतन्य किर यांनी केले तर आभार कार्यक्रमाचे आयोजक विजयराज पाटील यांनी मानले.



## विश्वनाथ गायकवाड यांचा राष्ट्रीय कार्यगौरव पुरस्काराने सन्मान

✔ **सुराज्य/मोडनिंब** : काव्य मित्र संस्था पुणे यांच्या वतीने भारताचे महामहिम राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीचे औचित्य साधून विश्वनाथ श्रीधर गायकवाड भारतीय व्यापारी नौदल अधिकारी व महाराष्ट्र संपर्कप्रमुख राष्ट्रीय मानवाधिकार आयोग भ्रष्टाचार निवारण भारत यांना राष्ट्रीय कार्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मा. योगिता मस्के प्रकल्प अधिकारी यशोदा तथा संस्थापक देवा फाउंडेशन, डॉ. शालिनीताई मालुसरे वंशज तानाजी मालुसरे, डॉ. चंद्रमणी इंदुरकर प्रा. जेल ऑफिसर्स ट्रेनिंग कॉलेज येरवडा. मा. जंगम उपाध्यक्ष इंडियन नर्सरी अन असोसिएशन महा. चॅप्टर, राज्याध्यक्ष विस्तार अधिकारी संघटना महाराष्ट्र वाघमारे साहेब यांच्या हस्ते हा पुरस्कार आचार्य अत्रे रंगमंदिर पिंपरी पुणे येथे देण्यात आला. सदर पुरस्कार विश्वनाथ गायकवाड यांनी त्यांच्या मातोश्री वत्सलाबाई श्रीधर गायकवाड यांच्या समवेत स्वीकारला.सदर पुरस्काराचे आयोजन राजेंद्र विमलाई श्रीमंत सगर संस्थापक अध्यक्ष काव्य मित्र संस्था पुणे व माननीय रश्मी कुमार अब्रोल मार्गदर्शक काव्य मित्र संस्था पुणे यांच्यावतीने करण्यात आले होते. काव्य मित्र संस्था सलग २२ वर्षापासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना राष्ट्रीय कार्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करते. कार्यक्रमात चार राष्ट्रीय कार्य पुरस्कार तसेच तीन राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार तसेच सहा राष्ट्रीय आदर्श महिला समाज भूषण पुरस्कार विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना देण्यात आले.

## भाजीपाल्यांचे दर स्थिर

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मंगळवार, १८ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार भाजीपाल्यांच्या दर स्थिर राहिले.



यामध्ये वांगी, कोथिंबीर, काकडी, लसूण, हिरवी मिरची, कांदा पात, कांदा, गहू आदींच्या किंमती स्थिर राहिल्या. तर कारली, कोबी, गवार, बटाटा, पालक आदींच्या किंमती प्रतिक्विंटल २०० ते हजार रूपयेने वाढल्या.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ३,००० | ९,००० | ५,००० |
| कारली | १,१०० | २,७०० | २,२०० |
| वांगी | ५०० | ५,५०० | २,००० |
| कोबी | ७०० | १,३०० | १,००० |
| ढोवळी मिरची | ८०० | २,००० | १,५०० |
| गवार | २,००० | ५,५०० | ४,००० |
| कोथिंबीर | २०० | १,००० | ५०० |
| काकडी | ८०० | १,५०० | १,००० |
| फ्लॉवर | २४० | १,६०० | ९०० |
| लसूण | १,००० | २,४०० | १,५०० |
| घेवडा | २,००० | ४,००० | ३,००० |
| हिरवी मिरची | १,००० | २,८०० | १,७०० |
| कांदा पात | ५०० | ८०० | ७०० |
| बटाटा | ७०० | २,५०० | २,४०० |
| लिंबू | १,५०० | ५,५०० | ३,००० |
| तांदूळ | ३,००५ | ६,३८५ | ३,७६५ |
| दोडका | ६०० | २,५०० | १,५०० |
| शेपू | ४०० | ८०० | ६०० |
| पालक | ३०० | ८०० | ५०० |
| टोमॅटो | ४०० | ३,००० | १,८०० |
| गहू | २,३०५ | ३,३५५ | २,७५५ |

## श्री समर्थ पतसंस्थेचे लवकरच बँकेत रूपांतर व्हावे

### बारा कोटीचा व्यवसाय

✔ सुराज्य/सोलापूर

श्री समर्थ महिला नागरी पतसंस्थेचा पहिला वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा झाला १२ महिन्यात १२ कोटीचा व्यवसाय करत नवा विक्रम केला आहे. आता या पतसंस्थेचे लवकरच बँकेत रूपांतर व्हावे अशी अपेक्षा मान्यवरांनी व्यक्त केली.



संस्थेच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमास सभासदांनी, खातेदारांनी गर्दी केली होती. मराठा सेवा संघाचे अध्यक्ष प्रशांत पाटील, महाराष्ट्र बिल्डर असोसिएशन चे अध्यक्ष दत्ता मुळे, अर्थतज्ञ प्रा. शंकर साळुंखे यांच्या हस्ते

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या अध्यक्षा निता दिनकर देशमुख यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून संस्थेचा आर्थिक आराखडा सादर केला. यावेळी प्रा. शंकर साळुंखे यांनी पतसंस्था काढण्या मागची भुमिका विषद केली. एका वर्षामध्ये एक महिला पतसंस्था एवढा मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करते अभिमानास्पद असल्याचे मत व्यक्त करत पुढील पाच वर्षात बँकेत रुपांतर होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, प्रशांत पाटी, दत्तात्रय मुळे यांनी भाषणात पतसंस्थेने कमी कालावधित केलेल्या कामाचा गौरव केला. पतसंस्थेचे व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष दिनकर देशमुख यांनी वर्षभरातील प्रगती व संस्थेच्या पुढील ध्येयधोरणाबाबत माहिती दिली. सोलापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशनच्या सीईओ पदी शुभांगी दयानंद जावळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. तर ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त. देवानंद चिलवंत, सिद्राम कोतली. श्री सुभाष गायकवाड, नागनाथ पाटील, चंद्रकांत दिवटे यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष रेणुका कोरे संचालक प्रणाली जाधव, सुवर्णा भोसले, मनीषा साठे, वैशाली साळुंखे, अरुणा यादव, डॉ. मंजुषा नन्नवरे, डॉ. अरुणा रुपनर, राजश्री जिाधव तसेच व्यवस्थापन मंडळ उपाध्यक्ष महावीर जाधव, विलास कोरे, बापू साठे, प्रवीण नन्नवरे, संजय साळुंखे सिताराम हंगरगी, प्रमोद यादव, संतोष भोसले पिग्मी एजंट अजित चौधरी, आदिनाथ सुरवसे, सुनील मोरे बँक कर्मचारी बिरदेव पांगरे तसेच ठेवीदार व खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते आभार महावीर जाधव यांनी मानले.

## लॅपटॉपसह चेकबुक पळवले

✔ **सुराज्य/सोलापूर** : मेकॅनिक चौक येथील हॉटेल अजंठा समोर पार्क करून ठेवलेली कार क्रमांक एम. एच. १२. क्युएफ. ५४५६ यामधील अज्ञात चोरट्याने दोन लॅपटॉप, बँकेचे चेक बुक, कागदपत्रे व सॅमसंग कंपनीचा टॅब चोरून नेला आहे.

हि घटना दि. १५ ऑक्टोबर रोजी पावणे बारा ते एक वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी अमर बाबू काटे (वय-४३, रा. फुलेनगर, मजरेवाडी, सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक डोके हे करीत आहेत.


### सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डि सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १८९/३ब/२ नवीन सर्व्हे नं. १८०/३ब/२ यापैकी कल्लपण्णा नगर, मधील १३७, १३८, १३९, १४० याचे एकूण क्षेत्र पूर्व पश्चिम : १०० फुट व दक्षिणोत्तर : ५० फुट असे एकूण क्षेत्रफळ ५,००० चौ.फुट अथवा ०.०४६५ चौ.मी. या मिळकतीबाबत आमच्या अशिलाने मंडळ अधिकारी सोलापूर, ता. उत्तर सोलापूर यांच्या न्यायालयात क्र.म.अ.सो./तक्रारनोंद/कसबे सोलापूर/४५५९९/२०२२ चा यात गजेंद्र दत्तात्रय फंड वगैरे यांच्याविरुध्द अर्ज दाखल करुन हक्कपत्रकी फेरफार नोंद क्र. ४५५९९ ही नोंद नामंजूर झालेला आहे. त्यामुळे काही दिवस असलेली नोंदही पोकळ नोंद होती. त्या नोंदीच्या आधारावर राजेंद्र दत्तात्रय फंड व विठ्ठल दशरथ कदम हे व नमूद मिळकतीचे विक्री करीत असल्याचे आमचे अशिलांस खात्रीलायकरित्या समजलेली आहे. सबब, गजेंद्र दत्तात्रय फंड (भाचा) व विठ्ठल दशरथ कदम (मामा) अगर त्यांचे एजंट व नोकर चाकर यांच्याशी वर नमूद मिळकतीबाबत मिळकत तबदीलचा व्यवहार करु नये. सबब, वर नमूद मिळकतीबाबत आमच्या अशिलांचे लेखी संमती व पूर्वपरवानगी शिवाय कोणीही कसल्याही व कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नये. अगर केल्यास तो आमचे अशिलांवर व वर नमूद मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही. कोणाची फसगत होऊ नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली दि. १८/१०/२०२२

सही/- **श्री. अशोक एम. म्हेत्रे, ॲडव्होकेट**
मो.नं. ९७३०३२११११
रा. ३४/२, न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर
**अशिल - श्रीदेवी आप्पाशा मायनाळे तर्फे**


## प्रथमवर्ष अभियांत्रिकी प्रवेशाची पहिली यादी जाहीर

✔ **सुराज्य/मोडनिंब** : अभियांत्रिकी पदवी प्रवेशाची पहिल्या फेरीची यादी दि. १८ ऑक्टोबर २०२२ रोजी जाहीर झाली आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी पुढील गोष्टी काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. ज्या विद्यार्थ्यांना अलॉटमेंट मिळाले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन रु. १,०००/- भरून सीट क्सेप्टन्स करणे गरजेचे आहे.

ज्या विद्यार्थ्यांना प्रथम ऑप्शन अलॉट झाले आहे, अशा विद्यार्थ्यांची जागा ऑटो फ्रिज होते व त्यांनी सीट क्सप्ट करुन मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक असते. ज्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंती क्रमांकांपासून पुढचे महाविद्यालय अलॉट झाले आहे आणि जर विद्यार्थी त्या महाविद्यालयास प्रवेश घेण्यास इच्छुक असतील त्यांनी फ्रीज ऑप्शन सिलेक्ट करून मिळालेली सीट रु. १००० भरून क्सेप्ट करावी व त्या महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा. जर आपल्याला मिळालेल्या पसंती क्रमांकाच्या वरच्या पर्यायाचे महाविद्यालय हवे असेल तर विद्यार्थ्यांनी नॉट फ्रिज करून हजार रुपये भरून सीट क्सेप्ट करावी व दुसऱ्या फेरीत सहभागी व्हावे.

## कुर्डूवाडीत नगरपरिषदेकडून फवारणी सुरु

✔ सुराज्य/कुर्डुवाडी

कुर्डूवाडी शहरात व परिसरात गेल्या दहा दिवसापासून सतत रिमझिम पाऊस सुरू असल्याचे डासांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे डेंगूसदृश्य रुग्णही वाढत असल्याने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण राठोड यांच्या सूचनेनुसार शहरात आरोग्य विभागाच्या वतीने फवारणी सुरू झाली आहे.

गेल्या पाच दिवसापूर्वी शहर व ग्रामीण भागात मुसळधार पाऊस झाल्याने कुर्डूवाडी शहरालगत ओढ्याला पूर आला होता. यामुळे परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी



शिरले होते. तर सततच्या रिमझिम पावसामुळे डासांचे प्रमाणात वाढ होत आहे. तर डेंगूसदृश्य रुग्णांची संख्या वाढ झाली आहे. यामुळे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण राठोड यांनी आरोग्य विभागाला तात्काळ जंतुनाशक फवारणी व धूर सोडण्याचे आदेश काढले होते. याची दखल घेत शहरात फवारणी सुरू झाली आहे. व धुर सोडला जात आहे. पाणी साठलेल्या भागात पुन्हा फवारणी करावी अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

### पाणी साठणारी ठिकाणे कोरडी करावी

शहरात पाणी साठवून राहणारे टायर, कुंड्या, जलकुंभ आदी ठिकाणी पाणी साठुन राहत असल्याने ते शोधून कोरडी करण्याची गरज आहे. या ठिकाणी डेंग्यूच्या डास वाढण्याची शक्यता आहे. नगरपरिषदेने या ठिकाणाची शोध घेऊन त्वरित पाणी साठलेले कोरडी करावी.


निवडणूक निर्णय अधिकारी,
**सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, सोलापूर**
**तथा सहाय्यक, निबंधक, सहकारी संस्था, उत्तर सोलापूर**
४५/२, श्रीखंडे बंगला, नवल पेट्रोल पंपाजवळ, रेल्वे लाईन, सोलापूर

**जाहीर प्रकटन**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, सोलापूर या सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ निवडणूक सन २०२२-२३ ते सन २०२७-२८ साठी सुधारीत निवडणूक कार्यक्रमातील महत्त्वाचे टप्पे खालीलप्रमाणे :

| नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची तारीख व वेळ | विधीग्राह्य नामनिर्देशनाची यादी प्रसिध्दी दिनांक व वेळ | आवश्यक असल्यास मतदान ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख | मतमोजणी ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख |
|---|---|---|---|
| दि. २७/१०/२०२२ ते दि. ०९/११/२०२२ सकाळी ११.०० ते दु. ३.०० पर्यंत | दि. १०/११/२०२२ सकाळी ११.०० वा. | दि. २०/११/२०२२ सकाळी ८.०० ते सायं ५.०० पर्यंत | दि. २१/११/२०२२ सकाळी ८.०० पासून |

**टिप** :- सविस्तर संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रम संस्थेच्या, निवडणूक निर्णय अधिकारी व जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

सही/- **(ए.ए. गावडे)**
निवडणूक निर्णय अधिकारी,
सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या., बाळे, सोलापूर तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उत्तर सोलापूर



### जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप असोसिएशन लि. सोलापूर ११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर-०१

**ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर - अर्जदार**
विरुध्द
(खालील तपशीलातील नमुद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद) **- जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | ४७०/२२-२३ | १,८५,५९३/- | ३ | **सुतार मुसा इसाक** रा. मु.पो. होटगी, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |
| | | | ४ | **काझी निजामोद्दीन रुकमोद्दीन** रा. मु.पो. सिध्देश्वर नगर नं. ४, मजरेवाडी, नई जिंदगी, सोलापूर |
| २. | ४७१/२२-२३ | २,४४,१७५/- | १ | **गवंडी सायबण्णा महादेव** रा. मु.पो. कणबस, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार गुरुवार, दि. १७/११/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रांसह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/१०/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

सही/- **उपनिबंधक**
सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप, असोसिएशन लि., सोलापूर

# बूथ बांधणीद्वारे पुन्हा एकदा सामान्य जनतेपर्यंत पोहोचणार : शेखर माने

## शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रभाग निहाय बैठका



✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघाच्या प्रत्येक प्रभागात तेथील राष्ट्रवादीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्या आगामी सोलापूर मनपा निवडणुकीच्या तयारीसाठी बूथ कमिटी स्थापन करून त्याद्वारे जन सामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी मोर्चे बांधणी करण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादीचे शहर निरीक्षक तथा प्रदेश संघटक सचिव शेखर माने यांनी सांगितले.

विरोधी पक्षनेते अजित पवार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या आगामी सोलापूर दौऱ्याच्या अनुषंगाने दिवाळी पूर्वी सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नियोजन सुरू आहे.

बैठकीची सुरूवात शहराध्यक्ष भारत जाधव यांच्या प्रमुख नेतृत्वात प्रदेश कार्यालय कडून नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या कोअर कमिटी सदस्य प्रदेश सचिव संतोष पवार, माजी महापौर यु.एन. बेरिया, ज्येष्ठ नेते तथा माजी महापौर महेश कोठे, माजी नगरसेवक तौफिक शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग १० पासून करण्यात आली.

यावेळी तेथील नगरसेवक प्रथमेश कोठे, शहर राष्ट्रवादी सेल अध्यक्ष रुपेश भोसले यांच्या वतीने आयोजित बैठकीला महिला शहराध्यक्षा सुनीता रोटे यांचेसह पक्षाचे शहराचे इतर प्रमुख पदाधिकारी तसेच प्रभागातील कार्यकर्ते उपस्थित होते. यानंतर शहरातील मध्य आणि दक्षिण विधानसभा मतदारसंघातील प्रभाग ११, २५, ७, १५, २३, ६ याठिकाणी देखील बैठका विधानसभा अध्यक्ष प्रकाश जाधव, तन्वीर गुलजार, अमीर शेख यांच्या सोबत आयोजक अहमद मासुलदार, नारायण माशाळकर, विक्रांत खूने, मकबूल मुल्ला, ज्ञानेश्वर सपाटे, बसवराज कोळी, अलमोहिद नाईकवाडी, सुनीता रोटे, दिलीप कोल्हे, चंद्रकांत पवार यांचे वतीने पार पडल्या.

या बैठकांचे आयोजन पुढील तीन दिवस करण्यात येणार असून त्याद्वारे जनसामान्यांच्या प्रश्नापर्यंत पोहोचण्यासाठी बूथ कार्यकर्ते तयार करून त्यांची बांधणी करण्यात येणार असल्याची माहिती पक्ष निरीक्षक शेखर माने यांनी दिली. या बैठकां दरम्यान नव्याने प्रभाग अध्यक्ष यांची निवड देखील करण्यात येणार असून प्रभागातील इच्छुक उमेदवारांची माहिती संकलन केली जाणार असल्याचे शहराध्यक्ष भारत जाधव यांनी सांगितले.

शहरात एकूण सहा प्रभागात झालेल्या बैठकांना युवक पदाधिकारी कार्यकर्ते महिला पदाधिकारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून आगामी तीन दिवसात इतर ज्येष्ठ नेत्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात युवती विद्यार्थी तसेच इतर पदाधिकारी एकत्र येऊन या बैठका यशस्वी करतील असे कोअर कमिटी सदस्यांनी सांगितले.



## जि.प. खंडाळी शाळेच्या मुलांनी बनवले आकाश कंदील

✔ **सुराज्य/वेळापूर** : खंडाळी (ता. माळशिरस) येथील जि.प. शाळेतील मुलांनी शिक्षकांच्या प्रशिक्षणातुन आकाश कंदील बनवले आहे. दिपावली व दशसूत्री कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम जि.प. शाळा खंडाळी मध्ये कला कार्यानुभव व शारीरिक शिक्षण विषय व दशसूत्री कार्यक्रमांतर्गत सुईमध्ये दोरा ओवणे, कापसापासून वाती तयार करणे, कापडाच्या तुकड्यांपासून हातावर शिवून पिशवी बनवणे, रुमाल तयार करणे, दिवाळी सणासाठी शुभ दीपावलीचे भेटकार्ड बनवणे, स्पंज पासून फुले बनवणे, कागदी पणत्या, मातीच्या पणत्या बनवणे तसेच विविध प्रकारचे आकाश कंदील तयार करण्याची कार्यशाळा शाळेच्या मुख्याध्यापिका सारिका महाजन, कविता हिंगमिरे, छाया पोळ, शितल बिराजदार यांच्या वतीने घेण्यात आले. तसेच शाळेतील शिवरायांच्या छोट्या मावळ्यांनी सुंदर असा किल्लाही बनवला व त्याला पणत्या आणि फुलांनी सजवले किल्ल्यावर छोटे शिवराय व त्यांचे मावळे ही अवतरले, या सर्व उपक्रमात शाळेतील सर्व शिक्षकांना शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.

## व्हीपी शुगर्सतर्फे शेतकऱ्यांना साखर वाटप

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : तडवळ (ता. अक्कलकोट) येथील व्हीपी शुगर्स या साखर कारखान्याच्यावतीने ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना दीपावली सणानिमित्त सोमवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२२ पासून साखर वाटप सुरू करण्यात आले आहे. साखर वाटप केंद्राचे विधिवत पूजा करून उद्घाटन कारखान्याचे चेअरमन सीए. व्ही. पी. पाटील व इतर मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. तडवळ व पानमंगरूळ गावातील ग्रामदैवतांना नैवेद्य म्हणून २०० किलो साखर देण्यात आली. गळीत हंगाम २०२१-२२ साठी गळीतास ऊस पुरवठा केलेल्या सर्व शेतकऱ्यांना दिपावली सणानिमित्त १० किलो साखर २० रुपये प्रति किलो या सवलतीच्या दराने दिनांक १७ ते २२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत कारखाना कार्यस्थळावरील माऊली कॉम्प्लेक्समध्ये साखर वाटपाचे नियोजन गटनिहाय तीन केंद्रामध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत करण्यात आलेले आहे. याप्रसंगी कारखान्याचे व्हा. चेअरमन गोकुळ शिंदे, प्रेसिडेंट, धीरज शिंदे, जनरल मॅनेजर व्ही. एम. गायकवाड, मुख्य शेती अधिकारी आर. एच. खटके, तडवळ गावचे सरपंच संतोष कुंभार, श्रीशैल करजगी व पानमंगरुळ गावचे सरपंच महादेव महाजन, बाबुराव कोरपे, आळगी गावचे माजी सरपंच म. महमदहनीफ कुमठे, कडल गावचे सरपंच काशीम तांबोळी, संगप्पा पाटील, चिदानंद कुंभार, गुरण्णा मूडगी, सुंदरकांत सोलापुरे, चनबसप्पा मरगुर, आशपाक सौदी, असवराज इंडे, रामण्णा बम्मणगे, भिमाशंकर जमादार, श्याम चौगुले, पंचलिंग बिराजदार, बिरण्णा येळमेली, सुभाष कामाठी, दयानंद माळगोंड उपस्थित होते.

## छावा संघटनेच्यावतीने तृतीयपंथी मोर्चा काढणार : लामतुरे

✔ **सुराज्य/उत्तर सोलापूर** : अखिल भारतीय छावा मराठा संघटनेच्या वतीने भीमा विकास विभाग क्र २ मधील कार्यकारी अभियंत्यानी बोघस कामे केली आहेत. यांची सखोल चौकशी करून निलंबीत करण्यासाठी तृतीयपंथी व गाढव मोर्चा काढण्यात येणार आहे असे मोहन लामतुरे यांनी जलसंपदा मंत्री, जिल्हाधिकारी सोलापूर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. भीमा विकास विभाग क्र २ मधील अभियंते नारायन जोशी, रमेश नागेश क्षीरसागर, उपविभागीय अभियंता नागेश जडे, ओमप्रकाश थंबद यांनी कार्यकाळात त्यांच्या कार्यक्षेत्रात केलेल्या बोगस कामाची चौकसी करण्यात यावी, शेतकऱ्यांची आर्थिक नुकसान केल असे. यावेळी रवींद्र कदम, गोपाळ आसबे उपस्थित होते.

## चुकीच्या नोंदीचा आदेश रद्द करावा

✔ सुराज्य/सोलापूर : माढा तालुक्यातील भोसे येथील येथील गट नंबर ४५९ /२ वर चुकीच्या पध्दतीने नोंद करण्यात आली असून रद्द करावी असी मागणी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना पार्वती पांडुरंग ओहोळ यांनी दिले असून यावेळी कविता महादेव ओहोळ, सचिन वजाळे, दादा शिंदे उपस्थित होते. गट नंबर ४५९/२ ही जमीन नवीन शर्तीची जमीन होती. जमीन घेणारा संतोष गोरे याने बनावट कागदपत्रे सादर केली,

## दिवाळी चार दिवसांवर मात्र आनंदाच्या शिधेसाठी गृहिणी प्रतीक्षेत

✔ सुराज्य/पंढरपूर

सर्वसामान्यांची दिवाळी गोड व्हावी तसेच नागरिकांना महागाईपासून दिलासा मिळावा याकरीता फक्त १०० रुपयांमधे प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि खाद्यतेल देण्याचा निर्णय राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आला. पंढरपूर तालुक्यातील ४१ हजार लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. मात्र दिवाळी चार दिवसांवर येउन ठेपली असतांनाही लाभार्थ्यांना शिंदे सरकारच्या भेटीची प्रतिक्षा लागून आहे. तसेच ग्राहकांना फक्त जाहिरातीवरच समाधान मानावं लागतय. कारण सरकारचा हा आनंदाचा शिधा अद्याप स्वस्त धान्य दुकानांपर्यंत पोहोचलाच नाही.




शिधा वाटपाला उशीर होण्याचं आणखी एक कारण म्हणजे ज्या पिशव्यांमधून हे शिधावाटप होणा आहे, त्या पिशव्यांवर मंत्री महोदयांचे फोटो छापले जाणार आहेत. त्यामुळे या पिशव्या आणि धान्य उपलब्ध झाल्यानंतरच शिधा वाटप केलं जाणार आहे. सर्वसामान्यांना दिवाळीच्या आधी १० ऑक्टोबरपासून हा शिधा मिळेल असं आधी जाहीर करण्यात आलं होतं. त्यानंतर ही तारीख वाढवून १५ ऑक्टोबर करण्यात आली. ती देखील उलटली मात्र तरीही शिधा दुकानापर्यंत पोहोचलेला नाही. दिवाळी चार दिवसावर आली असताना देखील शिधा मिळत नाही. गृहिणी दुकानांमधे दररोज शिधा आला का? म्हणून चौकशी करत आहेत. पण त्यांना मोकळ्या पिशवीसह परतावं लागतय. त्यामुळे दिवाळीच्या आधी हा शिधा आपल्याला मिळेल का हा प्रश्न त्यांना पडलाय.

### आनंदाचा शिधा लवकर देण्याचा प्रयत्न

आनंदाचा शिधा लवकर देण्याचा आमचा प्रयत्न आहे. दुकानदारांकडून चलन भरून घेतले आहे. त्यासाठीच्या सर्व गोष्टींची पूर्तता केली आहे. सध्या पाम तेल आणि रवा प्राप्त झाला आहे. इतर २ वस्तू उद्यापर्यंत येतील. त्यानंतर स्वस्त धान्य दुकानदारांना वितरित करण्यात येईल.

– **सदानंद नाईक**, रवठा निरीक्षक, पंढरपूर

## समाजभूषण नानासाहेब देशमुख सोसायटीच्या सभासदांना ९ टक्के लाभांश वाटप




✔ सुराज्य/नातेपुते

नातेपुते येथील समाजभूषण नानासाहेब देशमुख विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या सभासदांना सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या शुभहस्ते नऊ टक्के लाभांश वाटप करण्यात आला.

संस्थेचा ऑडिट वर्ग अ असुन संस्थेने दोन कोटी कर्जवाटप केले आहे. संस्थेचे चेअरमन संचालक यांच्या प्रयत्नाने व सभासदांच्या सहकार्याने संस्थेची शंभर टक्के वसुली झाली असल्याचे संस्थेचे मार्गदर्शक बाबाराजे देशमुख यांनी सांगितले. यावेळी अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, नातेपुते नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, संस्थेचे चेअरमन विलास काळे, व्हाईस चेअरमन धनाजी देशमुख, रेणुका पतसंस्थेचे चेअरमन अर्जुन जठार, बाळासाहेब काळे, महेश शेटे, संपत पांढरे, नारायण बोराटे, हनुमान जठार, रावसाहेब पांढरे, राहुल काळे, सुनील काळे, धनाजी पांढरे, सोनबा खरात, काशिनाथ सोनवणे, हर हर महादेव पतसंस्थेचे चेअरमन सागर इंगोले, सुभाष इंगोले, मोहन वाघमोडे, सचिव दशरथ साळुंखे, सहाय्यक प्रमोद कुलकर्णी तसेच सर्व संचालक सभासद उपस्थित होते.

## पीकअप धडकेत एक मयत

✔ सुराज्य/अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट स्टेशन येथे घरगुती बाजार करून घराकडे जात असणाऱ्या एकास पीकप गाडीने जोरात धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला. जगन्नाथ शामराव राठोड (वय ५२) रा. अंबाबाई मंदिराजवळ अक्कलकोट रेल्वे स्टेशन असे अपघातात मयत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पिकअप एमएच १५ ए. जे ०७८१ या चार चाकी वाहनावरील अज्ञात चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वाहन चालवून जगन्नाथ राठोड यांना समोरून जोरात धडक दिली. या धडकेमुळे त्यांचा मृत्यू झाला. या संदर्भातील फिर्याद त्यांचा मुलगा चंद्रकांत राठोड यांनी अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात दिली.

## पडसाळी-भेंडमधे ढगफुटी सदृश पाऊस

✔ **सुराज्य/मोडनिंब** : माढा तालुक्यातील पडसाळी येथे ढगफुटी सद्रुष्य पावसाने दयानंद ज्ञानेश्वर मुटकुळे यांचे नवीन लावलेले पाच एकर कांदा पिक वाहून गेले. शेतात पाणी च पाणी झाले. अचानक आलेल्या पावसाने गावातील सर्वच भागातील कांदा पिक वाहून गेले

अगोदरच माढा तालुक्यात गेले दोन आठवडे संततधार पाऊस पडत आहे. ओला दुष्काळ पडला आहे. दररोजच्या पावसाने पिके पिवळी पडली आहेत. भेंड व पडसाळी गावात मंगळवारी १८ ऑक्टोबर रोजी दुपारी दिड वाजण्याच्या सुमारास पडसाळी ढगफुटी झाल्यासारखा पाऊस पडला. एकाएकी आलेल्या पावसाने अख्या गावातील कांदा पिक वाहून गेले. पावसाचे थेंब टपोरे असल्याने नवीन लागवड केलेल्या कांद्याची रोपे वाहून गेले. तर सर्व शेतात पाणी साठल्यामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. पडसाळी हे गाव सोलापूर जिल्ह्यातील उत्कृष्ट कांदा उत्पादक गाव ओळखले जाते. गावातील प्रत्येक शेतकरी कांदा लागवड करतो. यंदा ही मोठ्या प्रमाणात कांदा लागवड झाली होती. आज झालेल्या पावसाने हे पिक वाहुन गेले. या भागात कांदा हे प्रमुख पिक आहे. या भागात माळरानावर मोठ्या प्रमाणावर कांदा पिक घतले जाते. शेतकरी यावरील उत्पादन घेऊन आपली गुजरान करतात. आज या भागात प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे आता या नुकसान झालेल्या कांदा पिकांची नुकसान भरपाई मिळावी असी मागणी शेतकऱ्यांतुन होत आहे.

सुराज्य सोलापूर

Classified

**विवाह विषयक**

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : **7387906921**
(121122)

**पाहिजे**

● श्री. तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर येथील कार्यालयात १ स्मार्ट लेडीची आवश्यकता (फोनवर माहिती सांगण्यासाठी) आहे. शिक्षण किमान १२ वी आवश्यक, अपेक्षित पगार दिला जाईल. गरजूंनी संपर्क साधावा.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : **8378851719**
(261022)

## वेळापुरात संजीवनी आय.सी.यु. व ट्रॉमा सेंटरचे उद्घाटन

✔ सुराज्य/वेळापूर

राष्ट्रीय महामार्गाच्या कनेक्टिव्हिटीमुळे झपाट्याने चौफेर विकास होत असलेल्या वेळापूर व परिसरातील नागरिकांची गरज पाहता, येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या संजीवनी आय. सी. यु. व ट्रॉमा सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व धन्वंतरी देवतेचे पूजन करून सेंटरचे लोकार्पण करण्यात आले.

यानंतर भाजपचे नेते के. के. पाटील, माजी जि. प. सदस्य सतिशराव माने देशमुख, पं. स. सदस्य रणजितसिंह जाधव, धानोरे सरपंच जीवन जानकर, भाजपा तालुका उपाध्यक्ष अमरसिंह माने देशमुख, प. स. सदस्या रेणुका माने देशमुख, रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलींद सरतापे, वैद्यकिय अधिकारी बापूराव ओहाळ, महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष डॉ. बाळकृष्ण गायकवाड, निमा संघटनेचे तालुकाध्यक्ष डॉ. शिरिष रणवरे, बोंडले सोसायटीचे चेअरमन मधुकर जाधव, बोंडले सरपंच विजयसिंह माने देशमुख, उपसरपंच महेंद्र लोंढे, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक लालासाहेब देशमुख, दौलतराव देशमुख, प्रविण देशमुख कासेगाव, डाळिंब बागायतदार




गुरूदेव देशमुख (आटपाडी), तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष निनाद पाटील, जेष्ठ पत्रकार महादेव जाधव अशा विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते आय. सी. यु. व ट्रॉमा सेंटरमधील वेगवेगळ्या विभागांचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी भाजपा ओबीसीमोर्चा तालुका अध्यक्ष शंकरराव काकुळे, माजीसरपंच माणीक चव्हाण, प्रभाकर सर इंगवले देशमुख, डॉ. समीर दोशी, डॉ. शिवाजी नरळे, डॉ. सचिन सावंत, डॉ. प्रविण मिसाळ, डॉ. आनंद देशमुख, डॉ. जयंत चव्हाण, डॉ. रवी देशपांडे, अजित साठे, डॉ. अभिजित राजे-भोसले, डॉ. नवनाथ दगडे, मल्हारी पिसे उपस्थित होते. माळशिरस तालुक्यातील वेळापूर व परिसरातील वाढती लोकसंख्या व राष्ट्रीय महामार्गामार्गांच्या कनेक्टिव्हिटी मुळे येथील प्रगतीचा वाढता आलेख लक्षात घेऊन येथील नागरिकांना गंभीर आजारांवर व अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकिय मदत मिळावी, या उद्देशाने येथील गरज पाहून आम्ही संजीवनी आय. सी. यु. व ट्रॉमा सेंटर सुरू करीत आहोत. अशी माहिती सेंटरचे संचालक डॉ. चिराग व्होरा यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिली.

कार्यक्रम पार पाडण्यासाठी संजीवनी आय. सी. यु. व ट्रॉमा सेंटरचे सर्व संचालक डॉ. उमेश नाईक, डॉ. प्रशांत जवंजाळ, डॉ. श्रीकर देशपांडे, डॉ. स्वप्निल नागटिळक, डॉ. तुषार माने, डॉ. गजानन कवडे, डॉ. सागर काळे, डॉ. विजय सुरवसे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. किशोर पिसाळ, डॉ. विनोद एकतपुरे, डॉ. राजेंद्र लाले, डॉ. नवनाथ खांडेकर यांनी परिश्रम घेतले.

## स्वेरीच्या चार विद्यार्थ्यांची 'कोडीटास' कंपनीत निवड

✔ सुराज्य/पंढरपूर

कोडीटास' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील चार विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे. ' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

कोडीटास' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून संस्कृती राजकुमार पैतवार, गीतेश्वरी अनिल शिंदे, मधुरा मिलिंद बडवे व ओंकार विलासराव कुलकर्णी या चार विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी वार्षिक रु. ६ लाखांचे पॅकेज मिळाले आहे. १९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरी अभियांत्रिकीमधून प्लेसमेंटच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. स्वेरी' मधून विविध कंपन्यात प्लेस होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे

### वार्षिक ६ लाखांचे पॅकेज

सध्याच्या आकडेवारीवरून दिसून येते. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते. स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले जाते व मोठमोठ्या कंपन्यांना हवे तसे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी घडविण्यासाठी प्रशिक्षित तज्ञांकडून उत्कृष्ट मार्गदर्शन केले जाते.

संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष नामदेव कागदे, उपाध्यक्ष अशोक भोसले तसेच संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकांनी कोडीटास' कंपनीममध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या संस्कृती पैतवार, गीतेश्वरी शिंदे, ओंकार कुलकर्णी व मधुरा बडवे विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# सरकारी बाबूंची चांदी, सरकारकडून दिवाळी भेट

## दिवाळीपूर्वी वेतन; शिंदे-फडणवीस सरकारचा मोठा निर्णय



### शासन निर्णयात काय म्हटलेय?

दिवाळी सणाची सुरुवात यावर्षी २२ ऑक्टोबर, २०२२ पासून होत आहे. राज्य शासकीय अधिकारी /कर्मचारी तसेच निवृत्तीवेतनधारक यांना दिवाळी सण साजरा करताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये या उद्देशाने ऑक्टोबर २०२२चे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये देय होणारे वेतन/निवृत्तीवेतन दिवाळी सणापूर्वी देण्याचा सरकारचा विचार होता. राज्य सरकारने वेतन अदा करण्यासंदर्भातील नियम शिथील करुन ऑक्टोबर २०२२ या महिन्याचे वेतन आणि निवृत्तीवेतन २१ ऑक्टोबर २०२२ रोजी अदा करण्याचा निर्णय घेतला.

### या निर्णयाचा लाभ कुणाला होणार?

जिल्हा परिषद, मान्यताप्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, कृषी विद्यापीठे/अकृषी विद्यापीठे व त्यांच्या संलग्न अशासकीय महाविद्यालयांचे अधिकारी/कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारक यांना देखील याचा लाभ होणार आहे. यासंबधीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश देखील संबधित यंत्रणा आणि विभागांना देण्यात आले आहेत.

सुराज्य/मुंबई

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या सेवेतील अधिकारी, कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांना दिवाळी गिफ्ट दिलं आहे. यंदाची दिवाळी ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस येणार असल्याने कर्मचाऱ्यांच्या ऑक्टोबरच्या वेतनाबाबत सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. यासंबंधीचा शासन निर्णय राज्य सरकारकडून प्रसिद्ध झाला आहे. राज्य सरकारच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी म्हणजेच २१ ऑक्टोबरपर्यंत वेतन अदा करण्याचे आदेश देणारा शासन निर्णय जारी झाला आहे.**

**कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार!**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या काही दिवसांपूर्वी राज्य सरकारच्या सेवेतील पाच लाख कर्मचाऱ्यांना दिवाळीसाठी १२,५०० रुपयांचा बिनव्याजी अग्रीम उचलण्यास मंजुरी दिली होती. २०१८ नंतर हा निर्णय घेण्यात आला होता. १२,५०० रुपये दहा हप्त्यांमध्ये परत जमा करण्याची मुभा कर्मचाऱ्यांना देण्यात आली होती. आता त्यानंतर दिवाळीपूर्वीच ऑक्टोबर महिन्याचे वेतन जमा करण्याचा निर्णय घेत राज्य सरकारने कर्मचाऱ्यांना दिलासा दिला आहे.

# भाजप नेत्याकडे एक कोटी सापडले

सुराज्य/तेलंगण

**तेलंगणाच्या नालगोंडा जिल्ह्यात तपासणीदरम्यान भारतीय जनता पक्षाच्या नेत्याच्या कारमध्ये १ कोटी रुपये सापडले. चेलमेडा चेक पोस्टवर तैनाता असलेल्या पोलिसांनी भाजप नेत्याकडे पैशांचा हिशोब मागितला. मात्र त्याला समाधानकारक उत्तर देता आले नाही. यानंतर पोलिसांनी रोकड जप्त केली. येत्या ३ नोव्हेंबरला नालगोंडाच्या मुनुगोडे विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होत आहे. त्याआधी भाजप नेत्याच्या कारमधून रोख रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे.**

नालगोंडाच्या पोलीस अधीक्षक रेमा राजेश्वरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ ऑक्टोबरला जिल्हा पोलिसांचे पथक नेहमीप्रमाणे वाहनांची तपासणी करत होते. त्यादरम्यान दुपारी ३ वाजता चेलमेडा चेक पोस्टवर एक टाटा सफारी रोखण्यात आली. ही कार एस. वेणू नावाची व्यक्ती चालवत होता. तो तेलंगणाच्या करीमनगरच्या भाजप नगरसेविका सी. जे. वेणू यांचा पती आहे.



# शेतकऱ्यांच्या अनुदानाची उद्यापासून अंमलबजावणी

सुराज्य/मुंबई



**राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची शिंदे-फडणवीस सरकारची बांधिलकी असून, गेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर करण्यात आलेल्या घोषणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होत आहे.**

**त्याचाच भाग म्हणून महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत अल्प मुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ योजनेचा शुभारंभ २० ऑक्टोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात होणार असल्याची माहिती सहकारमंत्री अतुल सावे यांनी दिली आहे.**

राज्यात नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी २०१७-२०१८, २०१८-२०१९ आणि २०१९- २०२० हा कालावधी विचारात घेण्यात येणार आहे.

या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल करून नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्याच्या प्रकियेला सुरुवात करण्यात आली आहे. आत्तापर्यंत सुमारे ७.१५ लाख पात्र खातेदारांचे आधार प्रमाणीकरण झाले असून, २० रोजीच्या कार्यक्रमात निवडक पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन प्रमाणपत्र देण्यात येणार आहे असे सावे म्हणाले.

कर्जमुक्तीचा लाभ देत असताना वैयक्तिक शेतकरी हा निकष गृहित धरण्यात येईल. या योजनेसाठी केवळ राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांनी (बँकांकडून कर्ज घेऊन किंवा स्वनिधींतून) शेतकऱ्यांना दिलेले अल्पमुदत पीक कर्ज विचारात घेण्यात येईल. २०१९ वर्षामध्ये राज्यात झालेल्या अतिवृष्टी, महापुरामुळे नुकसान झाल्याने नैसर्गिक आपत्ती अंतर्गत कर्जमाफीचा लाभ मिळालेले शेतकरीसुद्धा या योजनेस पात्र असतील. तसेच एखादा शेतकरी मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांनी कर्जाची परतफेड केली असल्यास वारसांनाही प्रोत्साहनपर योजनेच्या लाभास पात्र असतील.

योजनेच्या निकषांची पूर्तता केलेल्या कर्जखात्यांची माहिती राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. सदर प्राप्त याद्यांचे संगणकीकरण करण्यात येऊन पात्र लाभार्थींची यादी प्रसिद्ध करण्याची कार्यवाही शासन स्तरावर करण्यात येईल.

# पुण्यात ढगफुटीसदृश पावसाचा लोंढा थेट दगडूशेठ मंदिरात



सुराज्य/मुंबई

पुण्यात परतीच्या पावसाने मध्यरात्री अक्षरश: हैदोस घातला होता. पुण्यात ढगफुटीसदृश्य पाऊस पाहायला मिळाला. पुण्यात रात्री विजेच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. पुण्यात अनेक ठिकाणी रस्त्यांना नद्यांच स्वरुप आल्याचं पाहायला मिळाले. दगडूशेठ मंदिरात देखील पावसाचं पाणी शिरले. मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून पाणी बाहेर काढण्याचे प्रयत्न करत आहेत. याव्यतिरिक्त श्रीमंत भाऊ रंगारी गणपती ट्रस्टच्या संग्रहालयात देखील पाणी लागलं आहे. दरम्यान पुण्यात पावसाचा जोर वाढणार असल्याचेही म्हटले जाते. पुण्यातील तुफान पावसाची दृश्य खरोखरचं काळजाचा ठोका चुकवणारी आहेत.

## चोरीचा जाब विचारल्याने दुकानदाराला बेदम मारहाण

सुराज्य/पुणे

दुकानातील ताडपत्री चोरणाऱ्या दोघांना जाब विचारल्याने दुकानदाराला गजाने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवार पेठेत घडली. दुकानदाराचा खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी आरिफ शेख, आकाश रजपूत (दोघे रा. मंगळवार पेठ) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अमीर फारूख शेख (२३, रा. मंगळवार पेठ) यांनी फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे अमीर यांचा ताडपत्री विक्रीचा व्यवसाय आहे. आरोपी आरिफ आणि आकाश दुकानाजळ थांबले होते. दोघांनी अमीर यांच्या दुकानातून ताडपत्री चोरल्याचे शेजारी असलेल्या दुकानदाराने पाहिले. याबाबतची माहिती अमीर यांना मिळाल्यानंतर त्यांनी आरोपी आरिफ, आकाश यांना जाब विचारला. तेव्हा आरोपींनी अमीर यांना गजाने बेदम मारहाण केली.

# दिवाळीपूर्वी केंद्र सरकारची शेतकऱ्यांना आणखी एक भेट

सुराज्य/नवी दिल्ली

### शेतकऱ्यांना दिलासा मिळेल

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने सरकारने हे मोठे पाऊल उचलले आहे. एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, रब्बी पिकांसाठी किमान आधारभूत किमतीत वाढ करण्याचा निर्णय २०१८-१९ च्या अर्थसंकल्पाच्या घोषणेची पूर्तता करण्यासाठी घेण्यात आला आहे. यात म्हटले की चढ्ढ संपूर्ण भारतातील उत्पादन खर्चाच्या १.५ पट निश्चित केला जाईल.

**केंद्रीय मंत्रिमंडळाने मंगळवारी रब्बी पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.**

ठाकूर म्हणाले की, 'मंत्रिमंडळाने गव्हाच्या एमएसपीमध्ये ११० रुपये, बार्ली १०० रुपये, हरभरा १०५ रुपये, मसूर ५० रुपये, मोहरी ४०० रुपयांनी आणि करडईमध्ये २०९ रुपयांची वाढ केली आहे. या वाढीनंतर आता गव्हाच्या एमएसपीमध्ये २१२५ रुपये प्रति क्विंटल, बार्लीच्या एमएसपीमध्ये १७३५ रुपये प्रति क्विंटल, हरभऱ्याच्या एमएसपीमध्ये ५३३५ रुपये प्रति क्विंटल, मसूरच्या एमएसपीमध्ये ६,००० रुपये प्रति क्विंटल, मोहरीच्या एमएसपीमध्ये ५४५० रुपयांची आणि एमएसपीमध्ये ५४५० रुपयांची वाढ झाली आहे. करडईचे भाव ५६५० रुपये प्रति क्विंटल झाले.

२०२३-२४ च्या पणन सत्रासाठी सर्व रब्बी पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्यास मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. मंत्रिमंडळाने मसूरच्या कमाल एमएसपीमध्ये वाढ केली असून मसूरचा एमएसपी प्रति क्विंटल ५०० रुपयांनी वाढवून ६,००० रुपये प्रति क्विंटल करण्यात आला आहे. कृषी खर्च आणि किमती आयोगाच्या शिफारशीनुसार सरकारकडून रब्बी आणि खरीप हंगामात वर्षातून दोनदा एमएसपी (किमान आधारभूत किंमत) जाहीर केली जाते. ऊसाची आधारभूत किंमत ऊस आयोग ठरवतो.

## हेलिकॉप्टर कोसळून सहा जणांचा मृत्यू

सुराज्य/उत्तराखंड : केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात हेलिकॉप्टरमधील सर्वच्या सर्व सहा जणांचा मृत्यू झाला आहे. प्रशासनाने तातडीने घटनास्थळी बचाव पथक पाठवले आहे. नारायण कोटी-गुप्तकाशीसाठी उड्डाण केले आणि केदारनाथपासून तीन किलोमीटर अंतरावर हा अपघात झाला.

# ऐन दिवाळीत धडकणार चक्रीवादळ

सुराज्य/मुंबई

**अलिकडेच अमेरिकेच्या हवामान खात्याने पूर्व भारतात 'सुपर चक्रीवादळ' धडकण्याची शक्यता वर्तवली होती. पण शनिवारी भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) हा अंदाज फेटाळून लावला. तसेच पूर्व भारतात कोणत्याही प्रकारच्या चक्रीवादळाचा धोका नसल्याचे हवामान विभागाने म्हटले.**

तथापि, मंगळवारी सकाळी कोलकाता येथील आयएमडीच्या प्रादेशिक हवामान केंद्राने बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ धडकणार असल्याची माहिती दिली आहे. सोमवारी दक्षिण अंदमान समुद्र आणि त्याच्या आसपासच्या परिसरात सौम्य चक्रीवादळ निर्माण झाल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे. आज सकाळपर्यंत हे वादळ उत्तर अंदमान समुद्र परिसरात होते, अशी माहितीही कोलकता येथील प्रादेशिक हवामान केंद्राने दिली. पुढील ४८ तासांत दक्षिण-पूर्व बंगाल आणि लगतच्या भागत हवेच्या कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता आहे. २२ ऑक्टोबरपर्यंत याचे चक्रीवादळात रुपांतर होईल. त्यानंतर हे वादळ पश्चिम-वायव्य दिशेने पुढे सरकण्याची शक्यता आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरात हे चक्रीवादळ आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे, अशी माहिती कोलकाता येथील IMD च्या RWFC ने जारी केलेल्या अधिकृत निवेदनात दिली आहे. या वादळाचं नाव 'सीतरंग' ठेवण्यात आलं असून या वादळाची दिशा नेमकी कशी असेल? याबाबत आताच भाष्य करणे खूप घाईचं असेल, असे मत हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे

### महाराष्ट्रावरही होणार परिणाम?



# सायबर सुरक्षा अभ्यासक्रम राबवण्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निर्देश

सुराज्य/पुणे

पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्याशाखांमध्ये 'सायबर सुरक्षा' अभ्यासक्रम राबवण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) देशभरातील विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांना दिले. जागरूक, जबाबदार नागरिक घडवण्याच्यादृष्टीने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आल्याचेही युजीसीने स्पष्ट केले.

युजीसीने सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधीचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले. सायबर जागरुकता दिवसाच्या औचित्याने सायबर सुरक्षा अभ्यासक्रम सादर करण्यात आला आहे. उच्च शिक्षण संस्थांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत जागृती करण्यासाठी या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे नमूद करण्यात आले आहे. सायबर सुरक्षा, सायबर गुन्हे, सायबर कायदा, समाजमाध्यमे आणि सुरक्षितता, ई कॉमर्स अँड डिजिटल पेमेंट्स, डिजिटल साधनांची सुरक्षितता, सायबर सुरक्षेची साधने आणि तंत्रज्ञान या घटकांचा पदवी स्तराच्या अभ्यासक्रमात समावेश आहे.

# पात्र नसतानाही 'किसान सन्मान'चा लाभ

## ७,५५९ अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यात शासनाचे ८ कोटी

सुराज्य/नागपूर

**शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी 'पंतप्रधान शेतकरी सन्मान योजना' सुरू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून देण्यात येणारी सहा हजारांची रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २ हजार रुपयांच्या तीन हफ्त्यामध्ये जमा केली जाते. मात्र करपात्र उत्पन्न असल्याने निकषात न बसणारे ७ हजार ५५९ शेतकरीही या योजनेचा लाभ घेत असल्याचे पुढे आले. त्यांच्या खात्यात शासनाचे ८ कोटी ९ लाख ३० हजार रुपये जमा झाले. ही बाब लक्षात आल्यानंतर आता त्यांच्याकडून या योजनेचे पैसे वसूल करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे.**

१ फेब्रुवारी २०१९ रोजी केंद्र सरकारद्वारे शेतकऱ्यांसाठी 'पंतप्रधान शेतकरी सन्मान योजने'चा शुभारंभ करण्यात आला. या योजनेच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून देण्यात येणारी एकूण सहा हजारांची रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २००० रुपयांच्या तीन हफ्त्यामध्ये जमा केली जाते.

सरकारने सुरुवातीला २ हेक्टरपर्यंत शेतजमीन असलेल्या शेतकऱ्यांचा या योजनेत समावेश केला होता. पण, नंतर या योजनेची व्याप्ती वाढवून सर्वच शेतकऱ्यांना या योजनेत समाविष्ट केले. असे असले तरी घटनात्मक पदावरील व्यक्ती (राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, सरन्यायाधीश इ.), आजी-माजी लोकप्रतिनिधी (आमदार, खासदार, महापौर), आजी-माजी सरकारी कर्मचारी, करदाते, डॉक्टर, इंजिनीयर्स, वकील, सनदी लेखापाल, वास्तुरचनाकार यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे.




आतापर्यंत ११ हप्ते शेतकऱ्यांच्या जमा करण्यात आले. चार महिन्यांच्या अंतराने २ हजार रुपये जमा केले जातात. डिसेंबर ते मार्च पहिला हप्ता, एप्रिल ते जुलै दुसरा आणि ऑगस्ट ते नोव्हेंबर तिसरा असे तीन टप्पे तयार करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील २ लाख ५ हजार ६९५ शेतकऱ्यांच्या खात्यात ११ हप्ते जमा करण्यात आले आहेत. लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्याची तपासणी केली असता ७ हजार ९०९ शेतकरी करपात्र उत्पन्न असणारे आहेत. यापैकी ७ हजार ५५९ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला. २ हजार २२ अपात्र शेतकऱ्यांच्या खात्यातून १ कोटी ८४ लाख १४ हजार रुपये वळते करण्यात आले. उर्वरित अपात्र लाभार्थ्यांकडून ६ कोटी २५ लाख १६ हजार रुपये वसूल करावयाचे आहेत.

अपात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे असल्यास ते थेट वळते करण्यासाठी बँकेला पत्र दिले जाते. अन्यथा तलाठ्यामार्फत वसुलीची प्रक्रिया केली जात आहे. तहसीलदार यांच्या खात्यात पैसे आल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या खात्यात वळते केले जातात. जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून कृषी आयुक्तांना, तर कृषी आयुक्तांकडून केंद्र शासनाला हा पैसा परत केला जातो.

# ‘१० जनपथ’ चे सारथ्य कुणाकडे, खरगे की थरूर?

## कॉंग्रेसमध्ये ऐतिहासिक परिवर्तन, २४ वर्षांची परंपरा खंडित होणार



सुराज्य/पुरुषोत्तम कुलकर्णी

संबंध देशाचे लक्ष नवी दिल्लीतील ‘१० जनपथ’कडे एकवटले आहे. हे जनपथ म्हणजे अ.भा.कॉंग्रेस महासमितीचे कार्यालय. इथूनच पक्षाच्या रथाचे सारथ्य केले जाते. आज या रथावर एक नवा अध्यक्ष विराजमान होणार आहे. हा बहुमान कुणाच्या भाळी गोंदवला जाणार याचा फैसला आज होणार आहे. अध्यक्षपदासाठी मल्लिकार्जून खरगे व शशी थरूर या दोन ज्येष्ठ नेत्यांचे भवितव्य मतपेटीतून स्पष्ट होणार आहे. ९८वाव्या अध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याविषयी देशात उत्सुकता आहे.

स्वातंत्र्यानंतर तब्बल साठ वर्षे केंद्रीय व विविध राज्यांची सत्ता उपभोगलेल्या कॉंग्रेसला देशभक्तीचा जाज्ज्वल्य इतिहास आहे. स्वातंत्र्यासाठी कॉंग्रेसच्या कैक नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी ब्रिटिशांविरूद्ध लढताना बलिदान दिले आहे.एककाळ असा होता उभा देश कॉंग्रेसच्या राजवटींनी व्यापून गेलेला होता. पं.नेहरू, इंदिरा गांधी व राजीव गांधी या नेहरू-गांधी घराण्यातील व्यक्तींनी देशाला पुढे नेले. विकासाची दिशा दिली. सामाजिक क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवले.औद्योगिकरणाबरोबरच कृषी क्षेत्रात हरित क्रांती घडवली. राजीव गांधी यांच्यानंतर कॉंग्रेसचे काय होणार?

■ **मूव्हमेंट लिडर... :** ८० वर्षीय खरगे हे पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत. बिदर ही त्यांची जन्मभूमी तर आपल्या शेजारी असलेल्या गुलबर्गा ही त्यांची कर्मभूमी. तब्बल ९वेळा ते खासदार म्हणून निवडून आले. केंद्रात रेल्वे मंत्री म्हणून त्यांनी हुकूमत गाजवली तसेच कर्नाटकात गृहमंत्री म्हणून त्यांची कारकिर्द गाजली. खरगे यांची जडणघडण चळवळीतून झाली. विद्यार्थी संघटना ते संसदपटू अशी त्यांची राजकीय कारकीर्द विलक्षण आहे. विशेष म्हणजे गांधी घराण्याचा एकनिष्ठ नेता म्हणून त्यांची विशेष ओळख आहे. देशातील नेत्यांमध्ये त्यांच्याविषयी आस्था आहे. म्हणून मूव्हमेंट लिडर म्हणून खरगेंची खासियत आहे. कॉंग्रेसला चळवळीचा नेता हवा आहे,असे कॉंग्रेस नेते म्हणत आहेत. विशेष म्हणजे सोमवारी मतदान झाल्यानंतर जो जनमत कौल आला, तो खरगेंच्या पारड्यात होता.

■ **एसी लिडर... :** ६६ वर्षीय थरूर हेही कॉंग्रेसचे एकनिष्ठ नेते. केरळमधील तिरूवनंतपुरचे ते खासदार.भारतात आल्यानंतर त्यांचा ठिय्या राजधानी दिल्लीतच असतो. जास्त करून त्यांना लंडनची हवा मानवत असते. हस्तीदंत आणि ‘एसीरूम’मधला नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. चळवळीशी काहीही संबंध आलेला नाही. चिकना आणि गोरापान चेहरा हे त्यांचे व्यक्तीमत्व. गांधी घराण्यापासून चार हात लांबच. सुनंदा पुष्कर प्रकरणात त्यांचे नाव गाजले. देशात त्यांची फारशी ओळख नाही. पण दिल्लीत वजन आहे. इंग्रजीवर विशेष प्रभुत्व. २००२ते २००७ मध्ये युनोच्या उपसरचिटणीसपदी त्यांची निवड झाली होती. अध्यक्षपदासाठी एसी लिडर चालणार नाही,असे कॉंग्रेस कार्यकर्ते बोलत आहेत पण ते निवडून आलेच तर पक्षाला त्यांचे नेतृत्व मान्य करावेच लागेल.

अशी चिंता कॉंग्रेसच्या सामान्यजनांना लागून होती परंतु पी.व्ही. नरसिंह राव व डॉ.मनमोहन सिंग यांनी कॉंग्रेसला नव संजीवनी दिली. राव यांच्यानंतर अटल बिहारी वाजपेयी यांच्या अठरा पक्षांच्या ‘कडबोळे’ सरकारचा कार्यकाळ झाल्यानंतर केंद्रात कॉंग्रेसप्रणित यूपीएची सत्ता आली. सीताराम केसरी यांच्यानंतर कॉंग्रेस अध्यक्षपदाची धुरा श्रीमती सोनिया गांधी यांनी घेतली. कॉंग्रेसच्या परंपरेनुसार त्याच पंतप्रधान व्हायला हव्या होत्या. तशी तयारीही झालेली होती परंतु घोडे कुठे अडले कोणास ठाऊक? त्यांनी पंतप्रधान होण्यास नकार दिला. एकमात्र हे पद नको म्हणताना त्यांनी ‘ताटात नाही तर वाटीत’,हे सूत्र सांभाळले आणि आपल्या मर्जीतील डॉ. सिंग यांना राज्यसभेवर निवडून आणत पंतप्रधान केले. यूपीएची दहा वर्षे त्यांनी सत्ता गाजवली. या काळात भ्रष्टाचाराचा कॉंग्रेस राजवटीला मोठा डाग लागला. ही बाब भाजपच्या पथ्यावर पडली.

### सूर बदलला..

मॅडम हंगामी अध्यक्ष म्हणून काम करत असतानाच पक्षातील २३ नेत्यांनी हायकमांडना पत्र धाडण्याची हिम्मत दाखवली. देशात तरूणांना वाव दिल्याखेरीज कॉंग्रेसला अच्छे दिन येणार नाहीत,असा इशारा त्यात दिला गेला शिवाय कॉंग्रेसचे केंद्रीय अध्यक्षपद गांधी घराण्याखेरीज असायला हवे,असा एक नवा सूर आळवला गेला.त्याची दखल मॅडमना घ्यावी लागली. त्यानुसार तब्बल २४ वर्षांनी अध्यक्षपदाची निवडणूक होते आहे. (एरव्ही ‘१० जनपथ’वर रतीब असणाऱ्या नेत्यांनी मान डोलावली की,अध्यक्ष निवडला जायचा) या निवडणुकीमुळे अध्यक्षपदावरील गांधी घराण्याची परंपरा खंडित होणार आहे.



### बदलत्या काळाचा दणका...

काळ कसा बदलला हे कॉंग्रेसला उमजलेच नाही. भारतीयांची मानसिकता वाऱ्यासारखी कशी फिरली हेही हायकमांडना वेळीच लक्षात आले नाही. २०१४ च्या इलेक्शनमध्ये कॉंग्रेसला जबर दणका बसला. नरेंद्र मोदींच्या लाटेत केंद्रीय सत्तेतून कॉंग्रेस भुईसपाट झाली. २०१९ च्या निवडणुकीत मोदींचीच जादू सक्सेस झाली. संसदेत विरोध पक्षनेतेपदही मिळू नये, इतकी वाईट अवस्था कॉंग्रेसची झाली. दरम्यानच्या काळात सोनिया गांधी यांची प्रकृती साथ देईनाशी झाली तसेच कॉंग्रेसमध्ये तरूण रक्ताला वाव द्यावा,असा सूर आळवला गेला. त्यानुसार युवा नेते म्हणून राहुल गांधी यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा दिली गेली पण त्यांचा करिष्मा चालला नाही. देशात कॉंग्रेसला यश मिळवून देण्यात ते कमी पडले, शिवाय ‘१० जनपथ’वर तरूण तुर्क-म्हातारे अर्क असा संघर्ष सुरू झाला.त्याला वैतागूनच राहुल यांनी पद सोडून दिले.त्यानंतर हंगामी अध्यक्ष म्हणून मॅडमनीच चार्ज घेतला होता.

## डिपॉझिट जास्त असल्याने बीओटी प्रकल्पातील गाळ्यांना प्रतिसाद नाही

### तिसऱ्यांदा होणार लिलाव

सुराज्य/सोलापूर

शहरातील महापालिकेंतर्गत उभारण्यात येणाऱ्या तीन बीओटी प्रकल्पातील गाळ्यांना डिपॉझिट जास्त असल्याने प्रतिसाद मिळाला नसल्याने अखेर तिसऱ्यांदा लिलाव प्रक्रिया घेण्याची नामुष्की महापालिकेव आली आहे. त्यामुळे आता डिपॉझिट कमी करण्याबरोबरच ते चार टप्प्यात भरण्याची सवलत ही महापालिकेने दिली असल्याची माहिती महापालिका आयुक्त पी.शिवशंकर यांनी दिली.

सोलापूर शहरात महापालिकेच्या माध्यमातून बेगम पेठ, स्लॉटर हाऊस, पाच्छा पेठ या ठिकाणी तीन बीओटी प्रकल्प उभारण्यात येत आहे. याठिकाणी मटण मार्केटसह गाळेही बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पातील गाळ्यांची लिलाव प्रक्रिया यापूर्वी दोनवेळा राबविण्यात आली. परंतु डिपॉझिट रक्कम अधिक असल्याने व्यापाऱ्यांनी याकडे पाठ फिरवली. अखेर महापालिका प्रशासनाने त्यामध्ये लवचिकता आणत डिपॉझिटची रक्कम आता कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर ही डिपॉझिट तीस वर्षानंतर पाहिजे असल्यास परत देण्याचा निर्णयही घेतला आहे. दरम्यान दोन वर्षात चार टप्प्यांमध्ये २५ टक्क्यांप्रमाणे चार हप्त्यांमध्ये डिपॉझिटची रक्कम संबंधित व्यापाऱ्यांना आता भरता येणार आहे. यामुळे आता तिसऱ्या लिलाव प्रक्रियेस व्यापाऱ्यातून सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे.



**मिळकतदारांनाही सहभाग घेण्याचे आवाहन**

शहरातून जाणाऱ्या दोन उड्डाणपुलात ज्यांच्या मिळकती गेल्या आहेत त्यांना शासनाकडून मोबदला मिळणार आहे. अशा लोकांनाही या लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घेण्यात येणार आहे. संबंधितांनी या लिलाव प्रकियेत सहभाग नोंदवायचा आहे. जी रक्कम ठरेल त्यातून उरलेली रक्कम वजा करून पालिका त्यांना मोबदल्याची रक्कम देणार आहे, असेही आयुक्त शिवशंकर यांनी सांगितले.

## कुंभारी येथील रे नगरच्या पायाभूत सुविधांकरिता ३०० कोटी मंजुरीसह कार्यादेश पारित

### सभासदांकडून आनंदोत्सव साजरा



**सोलापूर :** रे नगरच्या माध्यमातून सोलापुरातील ३० हजार असंघटीत कामगारांना अत्याधुनिक पद्धतीने अद्यावत सुविधांसह सज्ज असे मजबूत घरांचा महत्वाकांक्षी गृहनिर्माण प्रकल्प कुंभारी येथे साकारत आहे. याच अनुषंगाने घरकुलांसाठी मुबलक पाणी, भूमिगत मलनिस्सार व्यवस्था, अंतर्गत रस्ते, रस्त्यालगतची गटारी यासाठी जवळपास ३०० कोटी रुपयांची गरज असून त्यासाठी लागणारी निधी राज्य सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. त्याचे प्रत्यक्ष कामाच्या तपशिलासह कार्याचे आदेश गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ कार्यकारी अभियंता ए.बी.खेडकर यांनी पारित केले आहे.

या निधींमध्ये यामध्ये २३६ कोटी हे पायाभूत सुविधांकरिता आणि विजेकारिता ६४ कोटी असे या निधीतून करण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांचा शुभारंभ करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते नोव्हेंबर महिन्यात करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे मुख्य प्रवर्तक तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी सभासदांना दिली असता सभासदांकडून लाल गुलाल उधळून, लाडू वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सिटू चे राज्य महासचिव ऍड.एम. एच.शेख, रे नगर फेडरेशन अध्यक्ष नलिनी कलबुर्गी, सचिव युसूफ शेख मेजर, सिद्धप्पा कलशेट्टी, मुरलीधर सुंचू, दाऊद शेख, नरेश दुगाने सुनंदा बल्ला, शेवंता देशमुख, कुरमय्या म्हेत्रे, रंगप्पा मरेड्डी, विल्यम ससाणे, वसीम मुल्ला, अँड.अनिल वासम, दीपक निकंबे मोहसीम पठाण, शाम आडम आदी उपस्थित होते.

### कट लागण्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर :** गाडीचा कट लागण्याच्या कारणावरून एकास शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना दि.१७ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास जुना तुळजापूर नाका ब्रिजच्या खाली घडली.याप्रकरणी कालिदास लक्ष्मण शिंदे (वय-३२,रा.अंबिका नगर,बाळे, सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून मच्छिंद्र उर्फ राजू ज्ञानेश्वर सगर (वय-३०,रा.नागेंद्र नगर,मुळेगाव रोड सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. जुना तुळजापूर नाका येथील ब्रिजच्या खाली फिर्यादी व फिर्यादी यांच्या कंपनीचे इंजिनीयर भावेश कुमार साह हे मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.बीवाय.८६७६ वरून जात असताना तेथील थांबलेल्या वरील संशयित आरोपी मच्छिंद्र सगर याने भावेश यांना तू मला कट मारतो का असे म्हणाला.त्यावेळी भावेश यांनी मैने कट नई मारा असे म्हणाला.त्यावेळी सगर यांनी तू मस्ती करतो का असे म्हणून पाच हजार रुपयाची मागणी करत फिर्यादी यांच्या शर्टाच्या खिशातील अकराशे रुपये काढून घेतले.त्यानंतर भावेश यांना फोन पे वरती पाच हजार रुपये पाठव अशी धमकी देत त्यांचा मोबाईल जबरदस्तीने हातात घेऊन टाईप करण्यास सांगून गाडी देत नसताना मच्छिंद्र सगर याने भावेश यांच्या हाताला चावा घेऊन जखमी केले.दरम्यान फिर्यादी यांच्या कंपनीची मोटारसायकल जबरदस्तीने घेऊन गेला. असे फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेचा पुढील तपास पोसई ताकभाते हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ; सात जणांवर गुन्हा

**सोलापूर :** तुला मुलं बाळ होत नाही,घरातील काम करता येत नाही, आम्ही आमच्या मुलाचे दुसरे लग्न करणार आहोत व तसेच व्यवसायाकरिता पाच लाख रुपये घेऊन ये असे वारंवार सासरकडच्या मंडळींनी विवाहितेला बोलून तिचा शारीरिक व मानसिक छळ करत मारहाण केल्याप्रकरणी पतीसह सात जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अनिता गोपाळ कुचलकुंडी (वय-३५,रा.न्यू आनंद नगर,मुमताज नगर,सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती गोपाळ राजेश्वरराव कुचलकुंडी,सासू शारदा कुचलकुंडी,सासरे रामेश्वर कुचलकुंडी,लहान दीर योगेश कुचलकुंडी,ननंद संध्या ताटेकर (सर्व.रा.मादापूर रविवार बाजार, औरंगाबाद) व विद्या पैय्यावाल रंजीत पैय्यावाल (दोघे रा.हुबळी राज्य कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोह.पवार हे करीत आहेत.

### रूपाभवानी मंदिराजवळून दुचाकी चोरी

**सोलापूर :** अज्ञात चोरट्याने रूपाभवानी मंदिराजवळ पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डी.झेड.९९७६ ही चोरून नेली आहे. ही घटना दि.१५ ऑक्टोंबर दरम्यान रात्री साडेआठ ते पावणे आठ वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी महादेव लक्ष्मण राठोड (वय-३६,रा.मु.पो.मुरुम,ता.उमरगा जि.उस्मानाबाद) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक शिवशरण हे करीत आहेत.

### चोरट्याने घरासमोरून मोटरसायकल पळवली

**सोलापूर :** राहत्या घरासमोर पार्क करून ठेवलेली मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३.सीवी.९९४७ ही अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेली आहे. ही घटना दि.१२ जून २०२२ ते १३ जून २०२२ दरम्यान फॉरेस्ट सोलापूर येथे घडली.याप्रकरणी साजिद इस्माईल अडते (वय-५४, रा.लोखंडवाला पॅराडाईज

### मोकाट जनावरांच्या मालकांवर कारवाई होणार

**सोलापूर :** सोलापूर शहरात मोकाट जनावरांचा त्रास वाढला आहे. रस्त्यांवर एकीकडे खड्डे भरपूर झाले असून, दुसरीकडे रस्त्याच्या मधोमध कळपाने उभी राहणारी वा रस्त्यातच ठाण मांडून बसणारी मोकाट जनावरे यामुळे वाहनचालकांचे हाल होत आहेत. याबद्दलच्या तक्रारी वाढत असल्याने आता महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी मोकाट जनावरांच्या मालकांवर कारवाई करण्याचे आदेश प्रशासनला दिले आहेत.

सोलापूर शहरात मोकाट जनावरे अनेक ठिकाणी भर रस्तावर ठाण मांडल्याने वाहतुकीस अडथळा होत आहे. वाहनचालकांचे हाल होत आहेत. यामुळे छोटे मोठे अपघात घडले आहेत. नागरिकांमधून महापालिका प्रशासना विरोधात संताप व्यक्त होत आहे. मोकाट जनावरे पकडण्यासाठी महापालिकेचे पथक आहे. गुरे वाहक वाहन आहे. ते पथक कुठे आणि काय कारवाई करते हाच मोठा प्रश्न आहे. पकडलेले मोकाट जनावर ७ दिवसांत घेण्यासाठी त्याचा मालक आला तर त्याच्याकडून २ हजार रुपयांचा दंड वसूल केला जातो. या मुदतीत जनावर घेण्यास कोणीही आले नाही तर त्या जनावरांना गो शाळेत पाठविले जाते. लहान जनावरास १ हजार तर मोठ्या जनावरास २ हजार रुपये दंड आकारण्यात येतो मात्र दंड जमा करून मालक त्या जनावरांना घेऊन जातात आणि पुन्हा तीच जनावरे रस्त्यावर दिसून येतात. यामुळे अडचण निर्माण झाली आहे. दरम्यान, रस्त्यावर मोकाट जनावरे फिरत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत महापालिका प्रशासनाला संबंधित जनावरांच्या मालकावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत अशी माहिती पालिका आयुक्त शिवशंकर यांनी दिली.





## डॉ.मेतन फाऊंडेशनकडून तीन शाळांना सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल मशिनचे वितरण

**सोलापूर :** सोलापुरातील मेतन फाऊंडेशनच्यावतीने हद्दवाढ भागातील देवराज प्राथमिक शाळा, मौनेश्वर मराठी विद्यालय, व सिध्देश्वर बालक मंदिर या तीनशाळांना निवासी उपजिल्हाधिकारी क्षमा पवार याच्या हस्ते सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल मशिनचे वितरण करण्यात आले. समाजाच्या जडणघडणीत महिलांचा सहभाग मोलाचा ठरतो.प्रत्येक क्षेत्रात महिला या प्रामाणिकपणे कार्यरत असतात,मात्र यामध्ये त्यांच्या आरोग्याचा प्रश्न हा महत्वाचा घटक ठरतो. म्हणून महिलांच्या आरोग्यावर समाजाचे भवितव्य अवलंबून असल्याचे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी व्यक्त केले.

पुढे बोलताना शमा पवार म्हणाल्या की,स्त्री शक्ती ही जगाला मिळालेली मोठी देणगी आहे. तिच्या आरोग्याबाबत समाजाकडून काळजी होणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी डॉ. मेतन फौंडेशनचे करीत असलेल्या सामाजिक कार्याचे त्यांनी कौतुक केले. या शाळेतील अनेक विद्यार्थिनी ह्या गरीब कुटुंबातील असून त्यांचे घर दूर असल्याने त्यांना मासिक पाळीदरम्यान सॅनिटरी नॅपकिन बदलण्यासाठी घरी जावे लागते. याच कारणाने अनेक विद्यार्थिनी शाळेला गैरहजर राहतात. या कारणासाठी या शाळेच्या मुख्याध्यापिकानी डॉ फाऊंडेशनकडे सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशिनची मागणी केली. डॉ. मेतन फौंडेशनने त्यांची मागणी तत्परतेने मान्य करून मशिन या शाळेसाठी मोफत दिली. यावेळी डॉ.व्यंकटेश मेतन यांनी मनोगत व्यक्त करताना फाऊंडेशनकडून विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी भविष्यात आणखी उपक्रम राबविणार असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापिका आशाराणी डोके यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी शाळेस सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशिन दिल्याबद्दल डॉ. मेतन फाऊंडेशनचे आभार मानले. यावेळी व्यासपीठावर मेतन फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ..व्यंकटेश मेतन, मुख्याध्यापिका आशाराणी डोके,मुख्याध्यापक सातलिंग शटगार,मुख्याध्यापिका सुरेखा चौधरी,सुनिता कोळी,गीता चिपमनी, सोमेश्वर लवंगे,चिदानंद मुस्तारे आदींची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंभुलिंग अकतनाळ यांनी तर आभार मुख्याध्यापक सातलिंग शटगार यांनी मानले. यावेळी वंदना लचमापुरे, मल्लिनाथ अचलेरकर, विश्वनाथ बिराजदार, ईलियास शेख, शशीकला सातपुते, स्मिताराणी चिवटे, संतोष पवार, पद्मसिंह व्हरडे,प्रसाद साळुंखे, निश्चलदास म्हेत्रे, जयंत गायकवाड, मळसिध्द केवटे,गिरीश शिंदे, संतोष बिराजदार, विनोद माशाळे,स्वाती म्याकल, महेश कुंभार, प्रफुल्लकुमार पाटील, प्रशांत यादव, बाबासाहेब बनसोडे, चंद्रकला कांबळे, मल्लिनाथ कोळी,अशोक विजापुरे आदी उपस्थित होते.

### तक्रारीच्या कारणावरून तरुणावर तलवारीने हल्ला

**सोलापूर :** सोलापूर (प्रतिनिधी) तक्रारीच्या कारणावरून तरुणावर तलवार व चाकूने वार करून जखमी केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.१७ ऑक्टोंबर रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास सिव्हिल चौक येथील चिराग हॉटेल समोर घडली.याप्रकरणी संगमित्र भगवान वारभुवन (वय-२९,रा.महाराणा प्रताप झोपडपट्टी,घर नं.१२०,कुमठा नाका सोलापूर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून ऋषभ उर्फ जाक्या थोरात (रा.आंबेडकर नगर गुरुनानक चौक), सोहेल मुल्ला (रा.कर्णिक नगर), वीरेश स्वामी ( रा. ७० फूट रोड), अथर्व बरसगी, शाहरुख शेख, रॉबो थोरात, शुभम बनसोडे (रा.तक्षशील नगर, कुमठा नाका सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादीचा मित्र ओम कसबे यास एमआयडीसी येथे केलेल्या मारहाणीबाबत आपण आपसात प्रकरण मिटवू पोलिसात तक्रार देऊ नको असे म्हणून फिर्यादीच्या ओळखीचे वरील संशयित आरोपी यांनी बेकायदेशीर जमावजमवून फिर्यादी संघमित्र यांना पोलिसात तक्रार दाखल करू नका असे म्हणून दमदाटी केली.तेव्हा फिर्यादी व फिर्यादीचा मित्र सचिन कांबळे,विकी बनसोडे हे सर्वजण त्यांना समजावून सांगत असताना फिर्यादी व फिर्यादीच्या मित्राला हाताने तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान ऋषभ थोरात याने त्याच्या जवळील तलवार काढून सचिन कांबळे यांच्या कपाळावर,छातीवर,कानावर तलवारीने वार करून जखमी केले.तसेच संशयित आरोपी सोहेल मुल्ला याने देखील सचिन कांबळे यांच्या छातीवर चाकूने मारून दुखापत केली.त्यानंतर इतर संशयित आरोपी यांनी शिवीगाळ करत हाताने मारहाण करून आम्ही कोण आहे तुम्हाला माहित नाही,असे म्हणून दमदाटी केली आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास पोसई बादोले हे करीत आहेत.



## राष्ट्रीय महामार्ग हस्तांतरणाचा विषय आता रस्ते प्राधिकरणाच्या बोर्ड मीटिंगमध्ये

### ▸ महापालिकेने दुरूस्तीसाठी पाठविला होता १६ कोटींचा प्रस्ताव

सोलापूर : डांबरीकरण करून सोलापूर शहरातून जाणारे दोन राष्ट्रीय महामार्ग महापालिकेकडे हस्तांतरण करण्यासंदर्भात प्राधिकरणाच्या केंद्रीय सचिवांशी महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी चर्चा केली आहे. दरम्यान, केंद्रीय रस्ते प्राधिकरणाच्या बोर्ड मीटिंगमध्ये या संदर्भात चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर शहरातून सोलापूर विजापूर व सोलापूर हैदराबाद असे दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. त्याची १४ कि.मी. लांबी आहे. प्रमुख मार्ग असल्याने हे दोन्ही रस्ते वरदळीचे आहेत मात्र गेल्या अनेक वर्षापसून या रस्त्यांची पुरती चाळण झाली आहे. वाहन चालकांना कसरत करावी लागते. अनेक अपघात छोटे-मोठे झाले आहेत. परंतु हे दोन्ही राष्ट्रीय महामार्ग महापालिकेने ताब्यात घ्यावे. यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पत्रव्यवहार करीत आहे मात्र राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हस्तांतरण करण्यापूर्वी हे दोन्ही रस्त्यांचे डांबरीकरण करून द्यावे. महापालिकेची आर्थिक क्षमता नसल्याने हे डांबरीकरण करावे, अशी मागणी महापालिका प्रशासनाने वेळोवेळी केली आहे.



महापालिका प्रशासनाकडून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे १६ कोटींचा प्रस्ताव पाठविला आहे. दोन्ही राष्ट्रीय महामार्ग रस्ता दुरुस्ती तसेच जमखंडी पुलाचे रुंदीकरण याचा यामध्ये समावेश आहे. जमखंडी पुलाच्या कामासाठी २५ लाखांचा प्रस्तावित खर्च आहे. दरम्यान, या संदर्भात महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे केंद्रीय सचिव जयस्वाल यांच्याशी चर्चा केली आहे. लवकरच होणाऱ्या बोर्ड मीटिंगमध्ये हा विषय घेण्यात येईल. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जैस्वाल यांनी सांगितले, अशी माहिती महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी दिली.